# एका रात्रीची बायको



संदीप शांताराम सुर्वे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

संदीप शांताराम सुर्वे

लिखित

दोन अंकी नाटक

# एका रात्रीची बायको

# एका रात्रीची बायको

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

एका रात्रीची बायको (दोन अंकी नाटक)

संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359 किंवा 9324466129

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# प्रिया लक्ष्मीकांत बेर्डे



"एक रात्रीची बायको"... संदीप सुर्वे तुमचं अभिनंदन...

खूप छान लिहिलंय नाटक, नाटक वाचत असताना पुढे काय होणार अशी उत्कंठा वाढत राहते, समाजातील वाढत्या विकृती आणि त्याच बरोबर चांगल्या प्रवृत्ती याचं उत्तम सादरीकरण अत्यंत मनोरंजक पद्धतीने या नाटकात केले आहे....

संवेदनशील विषय हाताळताना कुठे ही तोल सुटू दिला नाहीय ही या नाटकाची यशस्वी बाजू म्हणावी लागेल..

तुमच्या पुढच्या लेखनासाठी खूप खूप शुभेच्छा...💐💐💐💐💐💐💐😊😊😊😊

Priya Laxmikant Berde

Actress

# संदीप शांताराम सुर्वे



.

लेखक – दिग्दर्शक - गीतकार.

नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार. कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या पात्राचा.. त्या कथेचा आनंद घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी दिलेली दाद मिळते आणि मग अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणार्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थाने.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं..ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या अनेक नाटक, मालिका तसेच चित्रपटामधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेशजी वाडकर, सुदेशजी भोसले, साधना सरगम, वैशाली माडे, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, महेश राव अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

## मनोगत

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं मोठं असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रत्येक लिखाणाला रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

चित्रपट, मालिका, गीते लिहिताना माझ्या लेखनाची सुरुवात ज्या एकांकिका व नाटकांनी केली त्या सर्व एकांकिका व ती सर्व नाटके माझ्यासाठी अनमोल आहेत. **“यातुनच घडलो.. यातूनच बिघडलो.. म्हणूनच मित्रांनो... तुम्ही भी घडा ना.. तुम्ही बि..घडाना.”**

नाटक लिहिताना व ती दिग्दर्शित करताना जे सुख मिळतं त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. **“माझं पहिलं प्रेम.. माझं वेड.. म्हणजे रंगभूमी...”** म्हणूनच हे नाट्यपुष्प आपणा नाट्यवेड्यांसाठी सादर.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

**अर्पणपत्रिका**

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणार्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणार्या

**‘ ई साहित्य प्रतिष्ठान’**

या प्रकाशन संस्थेस
सदर पुस्तक
समर्पित.

संदीप शांताराम सुर्वे.
मुंबई.

# एका
# रात्रीची
# बायको

# पात्र परिचय

| | | |
|---|---|---|
| मनोरमा | : | वय ३० |
| वेलजीभाई | : | वय ५० |
| इन्स्पेक्टर / | : | वय ३५ |
| घंटानाद घंटे | : | वय ३५ |
| राजू | : | वय ३० |



# अंक पहीला

(एक मराठमोळं जुनाट पध्दतीचं घर . मधोमध मुख्य दरवाजा़ डाव्या बाजूला किचन, उजव्या बाजूला दिवाण, दिवाणाला लागून एक खिडकी, बाजूला टेलिफोन, किचन शेजारी खिडकी, मधोमध लाकडी सोफा . )

मनोरमाः (नऊवारी साडी नेसलेली, वय वर्षे ३०/३२ गणेश अथर्वशीर्ष म्हणत येते . देव्हा-यातील देवांना धूप दाखवित असते . तेवढयात दरवाजावर ठकठक होते . ) दरवाजा उघडाच आहे . ढकला आणि या आत . (दरवाजा उघडतो . एक सेल्समन (३५ वर्ष ) आत येतो. )

सेल्समन : वाह्ह्ह... लाइफमध्ये पहिल्यांदाच कुणीतरी " दरवाजा उघडाच आहे . ढकला आणि या आत . " असं म्हणालं. बाय द वे... मी माझी ओळख करून देतो. मी घंटानाद घंटे. एक मेहनती आणि प्रामाणिक माणूस आहे मी. हि पहा तुमची देवपूजा सुरु आहे आणि देवाने मला तुमची मदत करायला पाठवलं आहे.

मनोरमा : मी ओळखलं नाही तुम्हाला. आणि तुम्ही कसली मदत करणार माझी. राजूने तर...

सेल्समन : राजू.. म्हणजे तुमचे मिस्टर ना? कसं काय ओळखल मी... जेम्स बोंड ००७.... इकडे तिकडे नका हो पाहू... मीच जेम्स बोंड ००७... तसा मी सेल्समन आहे...

मनोरमा : सेल्समन...... ?

सेल्समन : हो. सेल्समन. म्हणजे जो घरोघरी येऊन वस्तू विकतो तो....

मनोरमा : तुम्ही जे कुणी असाल हो पण मला काहीच विकत घ्यायचं नाही आहे.

सेल्समन : असं कसं नाही घ्यायचं. आणि तेही दिवेलागणीच्या वेळेला... तुम्हाला घ्यावच लागेल.

मनोरमा : अशी काय जबरदस्ती करताय तुम्ही.... ? मग मला पोलिसांना बोलवावं लागेल हा.

सेल्समन : ओ... मी काय चोर वाटलो कि काय तुम्हाला... हे.. हे बघां....

(पिशवीतून साहित्य काढतो. )

हे अगरबत्तीचे पुडे.. हि अगरबत्ती घेतलीत तर त्यावर एक चंदन स्टिक फ्री आहे. चंदन स्टिक घेतलीत तर मग एक धुपाचं पाकीट फ्री आहे. धूप घेतलात तर मग एक कापराची वडी फ्री आहे... कापराची वडी घेतलीत तर मग त्यावर पुन्हा अगरबत्ती पुडा फ्री.... इतकं सगळं फ्री देतोय आणि तुम्ही मला चक्क चोर म्हणता...

मनोरमा : अहो... , मला काही नकोय तुम्ही जा आता... त्यांचा यायचा वेळ झालाय.

सेल्समन : राजुकाका यायची वेळ झालेय का? मग त्यांना भेटूनच जातो. तेव्हढेच स्नेह संबंध जुळतात एखाद्या बरोबर .

मनोरमा: अरे देवा... ओ भाऊ... तुम्ही या ना... मला ख रंच काहीच नकोय.

सेल्समन : असं कसं नको एकदम... आणि तेही दिवेलागणीच्या वेळी.... काहीतरी घ्यावंच लागेल तुम्हांला.. एकतर इतक्या स्कीम सांगितल्या तुम्हांला. थांबा पुन्हा सांगतो.... हे अगरबत्तीचे पुडे.. हि अगरबत्ती घेतलीत तर त्यावर एक चंदन स्टिक फ्री आहे. चंदन स्टिक घेतलीत तर मग एक धुपाचं

पाकीट फ्री आहे. धूप घेतलात तर मग एक कापराची वडी फ्री आहे... कापराची वडी घेतलीत तर मग त्यावर पुन्हा अगरबत्ती पुडा फ्री.... इतकं सगळं फ्री देतोय आणि तुम्ही मला चक्क जा म्हणता...

मनोरमा: हे बघा मिस्टर....

सेल्समन : घंटानाद घंटे... मिस्टर घंटानाद घंटे. हेच नाव आहे माझं. माझ्या नावाची गम्मत माहितेय का तुम्हांला. मी सांगितलीच नाही तर तुम्हांला कशी काय कळणार. ते काय झालं माहितेय माझा जन्म झाला आणि देवळात घंटा वाजायला लागल्या. आमचा घंट्या खुश झाला. घंट्या म्हणजे आमचे वडील. आई प्रेमाने बोलायची त्यांना घंट्या. आडनाव घंटे ना आमचं. देवळात घंटानाद झाला आणि घंट्या आणि घंटी... घंटी म्हणजे माझी आई... शेजारच्या बायका तिला घंटीच बोलायच्या. म्हणजे तशी प्रथाच आहे ना आपल्याकडे. राण्याची राणी... भोळयाची भोळी.. तशी घंट्याची घंटी... असो तर सांगायचा मुद्दा हा आहे कि... दोघेही ओरडले. घंटानाद.........

बस नाव पडलं मग माझं घंटानाद. काही कळलं तुम्हांला ? घंटा पण काही कळलं नसेल ना. जाऊ दे... तुम्हांला कळलं कि नाही ते महत्वाचं नाही आहे. तुम्हांला किती सामान देऊ ते सांगा नाहीतर मी असं करतो ना, आता आलोय तो थोडा वेळ थांबतो आणि राजुकाकांकाना भेटूनच जातो.

मनोरमा : प्लीज , तुम्ही जा आता.

सेल्समन : अहो जातोच आहे न मी. मी कुठे राहणार इथे. तुमच्या दोघान मध्ये घंटानाद कशाला हवाय. फक्त थोडं सामान खरेदी करा.

मनोरमा: एक मिनिट, हा हे घ्या १०० रुपये आणि जा आता.

सेल्समन : सामान तर घ्या १०० रुपयांचं. सगळया फ्री गोष्टी पण दिल्या आहेत तुम्हांला. तरीही काही राहून गेलं असेल तर मग नंतर देईन आणून. मी येतच असतो ह्या साईडला.

मनोरमा : हो ठीक आहे. (तो जातो. ती दरवाजा बंद करते. दरवाज्याची बेल वाजते. तो पुन्हा आत येतो. )

सेल्समन : पुन्हा नेक्स्ट विक मध्ये येऊ का ? नवीन अगरबत्ती येणार आहेत.

मनोरमा : (कपाळावर हात मारते. ) हो, पुढल्या आठवड्याला या. आता गेलात तर पुन्हा याल ना.

सेल्समन : हो ते हि ख रंच. (तो जातो. ती दरवाजा बंद करते. दरवाज्याची बेल वाजते. तो पुन्हा आत येतो. )

सेल्समन : राजुकाकांना नमस्कार सांगा हा माझा.

मनोरमा : हो नक्कीच. पुढल्या आठवड्यात भेटूनच जा ना त्यांना.

सेल्समन : हो हो.. नक्की.... (तो जातो. ती दरवाजा बंद करते. दरवाज्याची बेल वाजते. (ती वैतागून दरवाजा उघडते. वेलजीभाई पटेल वय वर्षे ५0 सफेद धोतर व सिल्कचा सदरा वटोपी घालून आत येतो . )

वेलजी ः नमस्कार मी वेलजीभाई पटेल असते . ते आपला राजूने...... आपला कॉन्ट्रॅक्ट . . . आपणच मनोरमाबेन असते ना . म्हणजे ते आपला दोघांचा फोनवर बोलणं पण झाला ना . (डोक्यावरचा घाम पुसतो . )

मनोरमा ः (हलकेच हसत) या बसा.

वेलजी ः हो......(वेलजी येऊन सोफ्यावर बसतो. )

मनोरमा ः तहान लागली असेल ना ? थांबा मी पाणी आणते.

वेलजी ः हो......चालेल. (ती हसत किचमध्ये जाते व माठातलं पाणी आणते. )

मनोरमा ः हं......हे घ्या. (वेलजी ग्लास घेऊन एका घोटात संपूर्ण ग्लास रिकामा करतो. ) एवढी तहान लागली होती.

वेलजी ः अं......हो...... ते म्हणजे......

मनोरमा ः (हसते. ) पण माठातलं पाणी होतं ते. आमच्याकडे फ्रीज नाही. म्हणजे आम्ही साधी माणसं नव्या जमान्याबरोबर नाही जमत आम्हांला. आम्हांला आपला माठच आवडतो.

वेलजी ः नाय म्हणजे आम्हांला पण नाय जमत नव्या जमान्याच्या गोष्टी. आम्ही पण हे बघा आजून धोतरच वापरतो. आमचा सनी आमाला रोज सांगते. सफारी, जीनस, टी-शर्ट घालायला. पन आमचा आपला हा एअरकंडीशनच बरा. (धोतर दाखवितो. ) एकदम कंम्फर्टेबल. (ती मोठयाने हसते. तो पुन्हा घाम पुसतो. ) आमचा सनी डॅड बिड बोलते ना...... तेला मी सांगते. बापू बोल... बापू ऐकलं की कसा बरा वाटतं...... लयं मोठ्ठे माणस होते बापू.

मनोरमा ः सनी तुमचा मुलगा का ?

वेलजी ः हो...... ते माझा एकलौता मुलगा असते. तुमचा......?

मनोरमा ः नाही. माझं कुणीही नाही. मुलगाही नाही आणि मुलगीही नाही. मी एकटीच......

वेलजी ः sorry.....

मनोरमा ः अं... हं...... चालायचंच...... थांबा मी चहा ठेवते तुमच्यासाठी

वेलजी ः नको...... चहा नको

मनोरमा ः चहा घेत नसाल तर कॉफी बनवू. मला तसा अंदाजच होता की तुम्ही चहा घेत नसणार म्हणून मुद्दामच कॉफी आणून ठेवली दुपारी.

वेलजी ः नाय तसा नाय. म्हणजे कशाला उगाच टाइम खोटी करायचा.

मनोरमा ः (हसून) असा कसा टाइम खोटी होणार. आता तर संध्याकाळचे सात वाजले आहेत. तुम्ही सकाळपर्यंत इथंच राहणार ना. तरीही अजून बारा तास आहेत ना आपल्याकडे.

वेलजी ः नाय तसा नाय. म्हणजे ते तुमाला आपला उगाच त्रास कशाला ना.

मनोरमा ः अहो त्यात कसला त्रास. आता बारा तास फक्त तुमच्याच शब्दांप्रमाणे सगळं होणार. आजच्या एका रात्रीची बायको आहे मी तुमची (वेलजी जवळ जात..) दहा हजार आणलेत ?

वेलजी ः हो आणले ना. हे घ्या...... (हातातल्या पाऊच मधून दहा हजार काढून देतो.)

मनोरमा ः मी पैसे मागितले नाही. फक्त आणले का म्हणून विचारलं. राहू देत. नंतर घेईन. आधी तुंम्हाला त्याचा मोबदला तर मिळू दे.

वेलजी ः तसा नाय मनोरमाबेन

मनोरमा ः मनोरमाबेन...... बेन नका म्हणू. नाहीतर मग रक्षाबंधनालाच यावं लागेल

तुम्हांला.... (हसते)

वेलजी ः ते काय आम्ही गुजराती लोक ना...

मनोरमा ः भाई आणि बेन शिवाय बोलतच नाही. (हसते) थांबा मी कॉफी आणते. (ती किचनमध्ये जाते. तो संपूर्ण घरावर नजर फिरवित दिवाणावर येऊन बसतो. खिडकीतून बाहेर पाहत असतो. ती कॉफी घेऊन येते.) खिडकीजवळ बसू नका. उगाच तुम्हांला कुणी पाहीलं तर मग लोक माझ्या चारिज्यावर शिंतोडे उडवायचे. (तो लगेच उठून मधल्या सोफ्यावर बसतो. ती त्याला कॉफी देते.) तसं इतकं कुणी ओळखंत नाही मला. पण तरीही.

वेलजीः (कॉफी पित. ) नाय ते समजते मला. काय, उगाच कशाला आपण आपली इज्जत...... (ती त्याच्याकडे पाहते. ) कॉफी छान आहे हा, आधी हे दहा हजार रूपये ठेवा. (तो पैसे देतो. ) तेचा काय, व्यवहारात आमी गुजराती लोक एकदम चोख असते. काय बी घ्यायचा असेल तरी एकदम पारखूनच घेते.

मनोरमा ः पण मला बघायच्या आधीच व्यवहार जमविलात.

वेलजी ः नाय ते राजू असते ना तेने म्हणजे...... सरळ सांगायचा तर हा व्येवहार आणि दुसरे व्येवहारात फरक असते ना. आनी आमी तुमचा नाव मनोरमा सहस्त्रबुधे...

मनोरमा ः सहस्त्रबुधे नाही सहस्त्रबुध्दे.

वेलजी ः तेच ते. ब्राम्हीण नाव ऐकला आणि डायरेक्ट सौदा डन करून टाकला. (ती वेलजीकडे पाहते. ) sorry......मला वाटते, मी थोडा जास्तच बोलला.

मनोरमा ः नाही हो. तुम्ही खरं तेच बोललात. एक ब्राम्हण स्त्री मिळत असेल तर कोण करंटा तोंड फिरवेल. स्वतःच्या सुखासाठी पुरूष वाट्टेल तेवढे पैसे मोजायला तयार असतो. (तो गडबडतो. ) थांबा हा मी जरा दिव्यात तेल ओतते. (ती

जाऊन देव्हा-यातील दिव्यात तेल ओतते. )

वेलजी ः तुमची देवपूजा बाकी एकदम मस्त आहे बघा. देव तुमच्यावर १00% खुश होणार बघा.

मनोरमा ः हो ना, म्हणून तर तुमच्याबरोबर सौदा डन झाला. (ती त्याच्याजवळ बसते.) तुमच्या घरी कोण असतं ?

वेलजी ः मी, माझी बायडी आनी माझा मुलगा सनी.

मनोरमा ः आमच्या घरी मी, मी आणि फक्त मीच.

वेलजी ः हा ते राजू बोलला तुमचे Husband बद्दल

मनोरमा ः दोन वर्षे झाली. मधुमेह झाला होता त्यांना......मधुमेह......म्हणजे डायबेटीस. घरातला कर्ता पुरूष गेला ना की सगळं जग पाठ फिरवितं. पण लगट करण्यासाठी मात्र झाडून सगळे मदतीला धावतात. एकटी सुंदर स्त्री आणि तीही ब्राम्हण म्हंटल्यावर......

वेलजी ः पन आपन तर पैसा दि......

मनोरमा ः पैसे दिलेयत आणि एका रात्रीसाठी विकत घेतलंत मला. असो, चालायचं. मी पण काय बडबडतेय. तुमच्यासाठी गरमागरम स्वयंपाक करते थांबा. (तो उठून उभा राहतो. ) जास्त टाइम खोटी नाय करणार तुमचा. (हसते. )

वेलजी ः जेवणाचा नको. मी ढोकला, जलेबी आनी कचोरी घेऊन आलोय. उगाच टाइम...... (पिशवी तिच्याकडे देतो. )

मनोरमा ः खोटी कशाला. (हसते.) तुम्ही गुजराती लोक पक्के व्यवहारी हा. (ती किचनमधून प्लेट आणते व ढोकळा, जिलेबी व कचोरी प्लेटमध्ये ठेवते.) हं......घ्या. तुम्हीच आणलेला खाऊ तुम्हांलाच. (दोघे हसू लागतात. )

वेलजी ः आमी गुजराती खाण्याचे खूप शौकीन असतात.

मनोरमा ः ते दिसतंय तुमच्याकडे पाहून. (हसते.)

वेलजी ः (खात) तुमच्या शेजारला कोन राहत नाय काय? बाजूच्या रूमला लॉक लावलाय.

मनोरमा ः हया मजल्यावरच्या दोनही खोल्या आमच्याच मालकाच्या आहेत. बाजूच्या खोलीमध्ये त्याचं सगळं सामान ठेवलयं. ती खोली तो भाडयाने देत नाही.

वेलजी ः तुमचा खोली भाडयाचा आहे काय ?

मनोरमा ः हो, आणि त्याचं भाडं देण्यासाठी आणि पोटापाण्यासाठी मी महिन्यातून फक्त एकदाच...... असो, तुम्ही खा ना. (तो जिलेबी उचलून खाऊ लागतो.) ते डायबेटीसनं गेले. गोड खूप खायचे ते.

वेलजी ः (हातातली जिलेबी खाली ठेवतो. ) मला पन डायबेटीस आहे. मला पन गोड खूप आवडते. ए मनोरमाबेन. sorry...... मनोरमाबाई. डायबेटीस सोडून दुस-या Topic वर बोला ना.

मनोरमा ः मी बापडी तुमच्यासमोर काय बोलणार. आजची रात्र तुम्ही बोलायचं.

वेलजी ः तुम्ही बोलायला बाकी एकदम मस्त हा. (तिच्या जवळ जात.) तुमचा आंख म्हंजे डोळा आनी समदा तुमीच एकदम मस्त, आमच्या गुजराती पापडी सारखा.

मनोरमा ः तुमची बायको पण खूप सुंदर असेल नाही.

वेलजी ः पापडी आनी फाफडामध्ये लय फरक असतो. तुमच्यासारख्या दहा म्हणजे एकटी माझी बायडी.

मनोरमा ः खूप प्रेम असेल ना तुमचं त्यांच्यावर

वेलजी ः आहे ना. एकदम तिचे साइजपरमाने प्रेम आहे माझे तिचेवर. लय मोठठा.

मनोरमा ः आणि तरीसुध्दा तुम्ही इथे.

वेलजी ः मी जाऊ काय? मी इथे टेन्शन कमी करायला आले असते की शाळा शिकायला......?

मनोरमा ः रागावल्यावर तुम्ही किती सुंदर दिसता. (त्याच्या जवळ जात. ) आता तुम्हांला पाहून असं वाटतयं......

वेलजी ः कसा वाटतयं......?

मनोरमा ः असं वाटतयं......

वेलजी ः कसा वाटतयं......?

मनोरमा ः तुम्हांला भूक लागलेय ना?

वेलजी ः ते माझा खाणं चालूच आहे मधे मधे. पण मनोरमाबाई ते राजू तुमचा काय लागते हो ?

मनोरमा ः कुणीही नाही. जसे मला दोन पैसे मिळतात, तसेच त्यालाही......

वेलजी ः म्हणजे दलाल...... (ती वेलजीकडे पाहते. ) sorry......माझा जीभ कसा झडला नाय. कवाकवा मी कायपन बोलते. तुमी राग मानू नका. मी तुमच्यासाठी एक सरप्राइजपन आणलाय. तुमी इथं बसायचा आनी आंख बंद करायचा. (ती सोफ्यावर बसते. तो स्वताःच्या गळयातली चैन काढून तिच्या गळयात घालतो. )

मनोरमा ः हे काय? वेलजीभाई, नाही हा असं......

वेलजी ः तोंड बंद ठेवायचा . बोलायचा नाही कायबी. आनी वेलजीभाई नाही फक्त वेलजी बोलायचा . उगाच भाईचा रिलेशन कशाला मध्ये......?

मनोरमा ः अहो पण......

वेलजी ः हा . . , हे तुमचा “अहो” आपल्याला लय आवडते . तर कसा वाटला आमचा सरप्राइज .

मनोरमा ः छान आहे . पण मला नको . आपल्यात जेवढी बोलणी झालेयत तेच बरं आहे . मी लोभ, आवड म्हणून हे सर्व करत नाही . आज माझं कुणीही नाही मरायची हिंमत होत नाही आणि फक्त जगण्यासाठीच ही तडजोड . महिन्यातली फक्त ही एक रात्र वर्षासमान भासते मला .

(पदराने डोळे पुसते . )

वेलजी ः तुम्ही हर दोन मिनटाला रडारड करणार तर मी आपला जाते . ते राजू बोलला म्हणून मी इथे आला . मी पन महिन्यातून एकदाच अहमदाबादवरून मुंबईला येते, माझे बिझनेसची वसूली करायला . ते चांदनी बार मंदी राजूशी ओळख झाला आनी तुमच्याबद्दल कळला . हे आपला पहली बार आहे बाहेर . आज मी एवढा हिंम्मत करून आला आनी तुमी सारखा सारखा रडते . मी सोचत होता हर महिन्याला वसूलीला येनार तवा इथंच येईल तर......

मनोरमा ः क्षमा करा . आता पुन्हा नाही डोळे पाणावणार माझे .

वेलजी ः जरा माला समजेल आसंच बोला . तिकडे बिझनेसचा टेन्शन आनी इकडे तुमचे बोलण्याचा . तुमाला माहितेय, मी डायमंड सप्लाय करते मुंबईमधे . डायमंड म्हणजे ते हिरा असते ना असलीचा ते .

मनोरमा ः वापरे, म्हणजे तुम्ही हिरा व्यापारी आहात ?

वेलजी : मंग, आमी हि-याचे व्येपारी असते. खुश झाले तर तुमालाबी हिरा गिफ्टमधे देल.

मनोरमा : नको मला गिफ्ट वगैरे. पण काय हो, तुम्हांला कामाचा खूप तणाव असेल नाही.

वेलजी : मंग इथे काय गोटया खेळायला आलेय मी. कामाचाच तणाव कमी करायला आलेय. पण तुमी तर लेक्चरवर लेक्चर देतेय मला.

मनोरमा : (त्याचा हात हातात घेत. ) I am extreamly sorry.

वेलजी : नऊवारी साडी आनी एवढा फाडफाड इंग्लिश......?

मनोरमा : पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये ग्रज्युएशन पूर्ण केलं. लग्नानंतर हयांना आवडायची म्हणून नऊवारी नेसायला लागले. आता सवयच होऊन बसली. तुम्हांला नाही आवडत नऊवारी......?

वेलजी : आवडते म्हंजे लय आवडते. (स्वतःच धोतर दाखवित. ) मी पण हाफ नऊवारी घालते ना. नऊवारी......नऊवारी...... शेम टू शेम.

मनोरमा : तुम्ही किती छान बोलता वेलजी भा......

वेलजी : भाई नाय बोलायचा. तुमाला बेन शब्द खटकते तर मंग आपल्याला पन भाई नाय चालेल. वेलजी आनी मनोरमा......किती मोठठा नाव आहे तुमचा मनोरमा. मी मनू बोलला तर चालेल काय ?

मनोरमा : मनू...... हे सुध्दा मला मनूच म्हणायचे. मनू दिव्यात जरा तेल बघ, मनू पानं वाढायला घे, मनू उदया श्रीखंड पूरीचा बेत कर, मनू माझं धोतर सापडत नाहीए.

वेलजी : मनू कॅन्सल...... मनोरमाच बरा आहे. कचोरी खा. लय चांगली आहे.

मनोरमा : अहो, तुम्हांला नऊवारी आवडत नसेल तर माझ्याकडे सहावारी देखील आहे. तुम्ही सांगा ना, नेसू सहावारी.

वेलजी : (तिचा हात हातात घेत. ) मनोरमा......, तू लय सुंदर आहे. आता मी हर महिन्याला तुला भेटायला इथं येल. तुला आता कोणाबरोबर सौदा करायचा गरज नाय. मी तुला हर महिन्याला बीस हजार रूपया पाठवेल. पण तू दुसऱ्या कोणासंगती नाय जायचा. (तिला जवळ घेत.) फक्त माझ्या संगतीच.

मनोरमा : तुमची रखेल बनून ? मी तुमच्याशी फक्त शरीराचा सौदा केलाय. मनाचा नाही.

वेलजी : ए मनोरमाबाई, मी काय जबरदस्ती नाय करते काय ? साला, पैसा टाकला की सर्व काय भेटते. पन आपन दहा ठिकानी मुंह मारणारा नाय. आपल्याला जे आवडते ना, ते आपलाच असते. जास्त पैसा पायजे तर सरळ सांगायचा. इकडून-तिकडून फिरवा-फिरवीचा नाय बोलायचा. दिसायला एकदम साधाच वाटते तू. आपल्याशी डबलगेम नाय खेळायचा काय. आपन इमोशनल फूल नाय काय. रात्र आपल्याबरोबर नाय घालवायचा तर सरळ सांगायचा हे असा चापटरगिरी नाय करायचा. (ती वेलजीकडे पाहत गालात हसते.) आपण इथे एवढा सिरीअसली बोलते आनी तू काय फिदीफिदी हसते गालात. (ती गाणं गुणगुणत उठते. व जुना ग्रामोफोन चालू करते. त्यावर 'लवं लवं करी पातं' गाणं सुरू होतं. ती तिथेच टेबलाला टेकून उभी राहते. ) खिडकी उघडाच आहे. कोन खालून बघायचा आनी उगाच...... (ती त्याच्याजवळ येते. मागून त्याच्या खांदयावर दोन्ही हात ठेवते. त्याच्या कानाजवळ तोंड आणते.)

मनोरमा : हयाच महिन्यात मी इथं राहायला आलेय. कुणीही मला ओळखत नाही आणि आपल्यात मघापासून जो लपंडाव चालला होता ना. तो म्हणजे, मी देखील तुम्हांला पारखून घेत होते. माझी देखील बाहेर ही पहिलीच वेळ...... पोट आणि शरीर दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत ना. पोटाच्या

समाधानाबरोबर शरीरही समाधानी असावच लागतं. शेवटी माणसाचा जन्म नेहमीच मिळत नाही वेलजी.

वेलजी : (आंवढा गिळत. ) माला घाम फुटलाय. थोडा पाणी मिळेल काय? (ती हसून किचनमध्ये जाते.) साला बाई आहे की चिनगारी. सगळीकडून धूर काढला माझा. (ती पाणी घेऊन येते. तो ग्रामोफोन बंद करतो.)

मनोरमा : हं......पाणी. गाणं का बंद केलंत आवडत नाही का तुम्हाला?

वेलजी : (पाणी पितो. ) आजून एक ग्लास मिळेल. ते काय फ्रीजची सवय आहे ना. मडक्यातला पाण्यानं तहान नाय मिटत.

मनोरमा : तहान लगेच मिटली की मग तहान लागल्याची मजाच कसली. माठाच्या पाण्याची रंगत फ्रीजमध्ये नाही सापडायची.

वेलजी : असां...... (तिला जवळ घेत. ) मग आजपासून माठातलाच पाणी पिणार हा वेलजी. (फोनची बेल वाजते. )

मनोरमा : थांबा मी फोन पाहते कुणाचा आलाय तो. (ती जाऊन रिसीव्हर उचलते.) हॅलो, हा राजू बोल ...... हो आलेयत वेलजीभाई

वेलजी : भाई नाय बोलायचा. (ती हसते. )

मनोरमा : काही नाही. . सहज हसले. आलेयत ते सायंकाळीच आलेयत खूप चांगले गृहस्थ आहेत. नाही, मला कसलंच टेन्शन नाही. त्यांच्याशी बोलायचयं. एक मिनिट हां...... राजूला बोलाय चंय तुमच्याशी. (वेलजी रिसीव्हर घेतो.)

वेलजी : हॅलो......, हा राजू......बोल......कुठे कायं......गप्पाच चाललेय आजून. नाय तसा काय घाई नाय. आता तर रात्रीचा दहाच वाजलाय. आजून बराच टाइम बाकी आहे. नाय काय नाय. आपल्याला असाच माठातला पाणी आवडते. माठातल्या पाण्याची रंगत थोडाच फ्रीजमंधी भेटनार. तू ठेव फोन मी जरा

पाणी पिते. अरे म्हंजे मी जरा मनोरमाबाईशी गप्पा मारतेय. तू फोन ठेव......(रिसीव्हर ठेवत तिच्याकडे पाहतो. )काय नाय ते राजू काय बी प्रश्न विचारते. त्याचा बडबड ऐकून माझा डोका दुखायला लागला माहितेय.

मनोरमा ः (वेलजीचा हात पकडून त्याला सोफ्यावर बसविते. ) तुम्ही इथे बसा पाहू. थांबा मी आलेच. (टेबलाच्या ड्रॉवर मधून तेलाची बाटली काढते. सोफ्यामागे उभी राहून हातावर थोडं तेल घेऊन वेलजीच्या डोक्याची मालिश करू लागते.)

वेलजी ः राहू दे एवढा पन नाय डोका दुखत

मनोरमा ः तुम्ही अजिबात हलायचं नाही. (तोंडाने विचित्र म्युझिक काढीत ती त्याच्या डोक्याची मालिश करते. ) आता कसं वाटतयं ?

वेलजी ः तेलाचा सगळा मडकाच माझ्या डोक्यावर उलटा नाय ना केला.

मनोरमा ः तुमचं पण आपलं काहीतरीच हा. (तो तिचा हात हातात घेतो. व हाताचा किस करतो. ती डोळे बंद करते. )

वेलजी ः मनोरमा, आजपर्यंत माझ्या बायडीने पन कधी माझा असा सेवा केला नाय. आनी तू...

मनोरमा ः शू SSS, आता मी तुमची बायडी आहे. एका रात्रीची का होईना. बायकोच आहेना मी तुमची. आजपर्यंत पुरूषाच्या वखवखलेल्या नजरा पाहिल्या, पण......

वेलजी ः मनोरमा......

मनोरमा ः (डोळे पुसत. ) आजची ही अशी पहिलीच रात्र माझ्यासाठी. . , हो ना करीत मनाला समजावित मी हया असल्या गोष्टीसाठी का तयार झाले फक्त मलाच माहीत. गेली दोन वर्षे अगदी आतल्या आत गुदमरतेय. लोकांच्या वाईट नजरेपासून वाचण्यासाठी हे भलं मोठं कुंकू आणि हे मंगळसूत्र णवरा गेल्यावरही

घालून वावरतेय. स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. फर्ग्युसन कॉलेजची ही ग्रॅज्युएट मुलगी तेव्हाही बावळट होती आणि आताही बावळटच. आज माझ्या घरातला प्रत्येक व्यक्ती दूर गेला माझ्यापासून. काय तर म्हणे, माझ्या नव-याला मी खाल्लं. मी पांढरया पायाची आहे. मी वांझोटी आहे. मी जिथं जाते तिथं काहीतरी अवचित घडतं. मी सगळयांना नकोशी होते. म्हणून पुणं सोडून आले निघून इथं. साधे मला शोधायचे कष्टही घेतले नसतील कुणी. पुण्याहून मुंबईत येताना राजूशी ओळख झाली बसमध्ये. त्यानेच ही खोली पाहून दिली आणि जगण्यासाठी एक नवा मार्ग सुचविला. आणि मीही तयार झाले व्हायला महिन्यातून एकदा 'एका रात्रीची बायको'. आयुष्यात कधी कोणत्या परपुरूषाचा विचारही केला नाही. तुमच्या स्पर्शात मला कुठेतरी त्यांचा स्पर्श जाणवला. भावनेच्या भरात तुमची थोडी सेवा कराविशी वाटली आणि मग आठवलं की हे फक्त आजची रात्रच. उदया तुम्ही तुमच्या मार्गाला आणि मी......

वेलजी : ए......असा नाय बोलायचा. आसूं पूस आधी. तुझे आसूं लय अनमोल आहेत बघ माझ्या हि-यांपेक्षा. आणि आता निगेटीव्ह नाय बोलायचा. तू आज माझी बायडी आहे ना. मग आपण दोघे आज एकदम खुश राहायचा तुला काय वाटते. देवानं तुलाच दुःखी बनविला. लोकांकडे पैसा असला की तो खूप सुखी असतो काय ? माणस जेवढा मोठा असते ना, तेवढा त्याचा दुःखपण मोठा असते. ए मनोरमा, माला एक कप गरमागरम कॉफी मिळेल काय ? कॉफी उरलेयं ना घरात. संपली असणार तर मंग जाऊ दे.

मनोरमा : आहे थांबा आणते. (ती किचनमध्ये जाते. तो ग्रामोफोन लावतो. 'केव्हातरी पहाटे......उलटून रात्र गेली......' तो गाणं ऐकत असतो. ती कॉफीचा कप घेऊन येते व त्याला कॉफी देते. तो ग्रामोफोन बंद करतो. )

मनोरमा : बंद का केलं गाणं ? किती सुंदर आहे न गाणं. फक्त काही क्षणातच आपल्या डोळयांसमोरून आपलं जीवनच तरळून जातं. हे गाणं ऐकणारा प्रत्येकजण हया गाण्यात स्वतःलाच हरवून बसतो. तुम्हांला आवडलं हे गाणं.

वेलजी ः आवडला म्हंजे. लय आवडला आणि एक गंमत ऐकायची हाय काय ?

मनोरमा ः गंमत. . ?

वेलजी ः हं......हया गाण्याची रेकॉर्ड आपल्याकडे पन आहे ?

मनोरमा ः काय ?

वेलजी ः निवडुंग पिक्चरचा ना हे गाणं ?

मनोरमा ः वेलजीभाई...

वेलजी ः भाई शब्द काढून टाका जरा

मनोरमा ः हो......हा, पण तुम्हांला माहितेय या पिक्चर . .

वेलजी ः लतादीदीच्या भावानी म्युझिक दिलाय ना या पिक्चरला.

मनोरमा ः अहो पण, आज प्रत्येक मराठी माणसाला कदाचित माहित पण नसेल निवडुंगबददल की, पंडीत हृदयनाथ मंगेशकरांनी जीव ओतलाय याच्या संगीतात.

वेलजी ः मनोरमाबाई, आमी गुजराती लोक लय पारखी असते ? काय चांगला आनी काय वाईट ते आमाला बराबर कळते. ते माझा एक मित्र आहे. तेच्या बरोबर मी पंडितजींचा कार्यक्रम पाहायला गेले होते. पंडितजींचा ते दुसरा गाणा आहे ना ‘ ती गेली तेव्हा रिमझिम......’ ते गाणं माला लय आवडला. मी ऐकू जरा ते गाणं.

मनोरमा ः तुम्ही कॉफी प्या . मी लावते ते गाणं. (तो कॉफी न पिता तिच्याकडे पाहत असतो. ती जाऊन गाणं लावते. ‘ ती गेली तेव्हा रिमझिम......’ तो जाऊन किचनशेजारील खिडकीत उभा राहतो. ती हळूहळू त्याच्या दिशेने जाते. तो खिडकीतून बाहेर पाहतोय. त्याचे डोळे पाणावलेले असतात. ती त्याच्या खांदयावर हात ठेवते. तो खिशातून रूमाल काढून डोळे पुसतो. )

वेलजी ः माझी आई मला सोडून गेली तेव्हा पन असाच रिमझिम पाऊस पडत होता. माझ्या हातानं ती शेवटचा पाणी प्यायली आनी माझ्यासमोरच गेली ती. (तो तिथेच तोंडावर हात घेऊन बसतो. ती जाऊन ग्रामोफोन बंद करते व किचनमधून पाणी आणून त्याला देते. तो पाणी पितो. ) मनोरमाबाई त्या प्रोग्राममध्येपन मी असाच रडला होता. आजपण जेवा बी मी हे गाणं ऐकते ना तेवा असाच डोळे भरते पाण्यानं.

मनोरमा ः शू SSS, (त्याच्या तोंडावर बोट ठेवते. ) रडायचं नाही. (ती पदराने त्याचे डोळे पुसते) तुम्हांला रडारड आवडत नाही नां. (ती हसते. ) आता या क्षणापासून आपल्या दोघांच्याही डोळयांतून पाणी येणार नाही. कळलं ? हे बघा, कॉफी थंड झाली सगळी. थांबा मी पटकन कॉफी गरम करून आणते. (ती उठून जात असते. तो तिचा हात पकडतो व तिला जवळ बसवितो. इतक्यात फोन वाजतो. ती लगबगीने जाऊन फोन उचलते. ) हॅलो, हा......राजू बोल. नाही काही प्रॉब्लेम नाही. हो, आहेत ते इथेच. बोलायचयं ? ठीक आहे. नाही काही नाही, थोडा आवाज बसल्यासारखा वाटतोय. हं......सकाळी फोन कर. (ती रिसीव्हर ठेवून वेलजी जवळ येते.) राजूचा फोन होता. काही नाही सहज. काही प्रॉब्लेम नाही ना म्हणून विचारत होता.

वेलजी ः राजू लय काळजी घेते तुमची ?

मनोरमा ः हो.

(दरवाजाची बेल वाजते. दोघे टेन्शन मध्ये. )

वेलजी : राजू तर आता फोन वर बोलला. मग आता कोण आला इथे अचानक.

मनोरमा : थांबा पाहते मी.

(दरवाजा उघडते. सेल्समन पटकन आत येतो. )

सेल्समन : हि घ्या कापराची वडी... मघाशी विसरूनच गेलो....

मनोरमा : अहो पण...

सेल्समन : फ्री आहे ती वडी.... मघाशी तुम्हाला जितके आईटेम दिले ना तेव्हा हि राहूनच गेली. आता काय झालं. मी जेव्हा टोटल सेल्स झाल्यानंतर हिशोबाला बसलो ना तेव्हा लक्षात आलं कि तुमची फ्री वाली कापराची वडी माझ्याकडेच राहिली.

मनोरमा : अहो मग राहू द्यायची ना. पुढच्या आठवड्यात दिली असती मला तरी चालली असती.

सेल्समन : असं कसं... असं कसं... आपलं सगळं काम एकदम चोख असतं... अरे हे कोण.... ? राजू काका........ बरोबर ना.... ? ओळखलं कि नाही मी.... जेम्स बोंड ००७.... इकडे तिकडे पाहू नका. मीच जेम्स बोंड.... कसे आहात तुम्ही... ? मला ओळखलं नाही तुम्ही.. ? (वेलजी पुन्हा मानेने नाही म्हणतो. ) अहो मी घंटानाद घंटे. आता ओळखलं मला... ? (वेलजी मानेने नाही म्हणतो. ) तुम्ही काय घंटा ओळखणार मला... ? अहो मी सेल्समन.... ह्या बघा.. ह्या अगरबत्त्या मीच विकल्या. काकू बोलल्या नाही का तुम्हांला.... ? काय हो.. सांगायचं ना माझ्याबद्दल काहीतरी यांना. काकू, काका किती मस्त जोडी आहे तुमची.... ? पण ना तुम्हांला काकू काका बोलावसं वाटत नाही. किती यंग दिसता तुम्ही एकदम माझ्या सारखेच. तुम्ही एखाद्या गुजरात्यासारखे कपडे का घातले आहात. हम्म..... फेन्सि ड्रेस... पण काही म्हणा मस्त दिसतो हा तुम्हाला.... हा ड्रेस (वेलजी टेन्स )

मनोरमा : तुम्ही या आता... एखाद्याच्या घरी इतक्या रात्री चांगली माणसे नाही जात. (वेलजी तिच्या कडे पाहतो. )

सेल्समन : बरोबर... पण काय हो... ? काका बोलत का नाहीत... ? मुके आहेत कि काय... ?

मनोरमा : त्याचं मौनव्रत आहे आज..

सेल्समन : हो... छान छान... माणसाने कधीच जास्त बोलू नये. मग समाजातली पत घसरते.

मनोरमा : हो ना.. मग तुम्ही पण जपा आता थोडीसी तुमची पत... काय.. ?

सेल्समन : हो हो म्हणजे काय... म्हणूनच मी एकदम कमी बोलतो.... मौनव्रत एकदम मस्त असतं हा. मी पण धरणार मौनव्रत... पण पुढच्या वर्षी.... ह्या वर्षीचा सेल्स टार्गेट कम्प्लीट झाला कि. काम नेहमी महत्वाचं असतं ना. काम घेतलं कि ते फत्ते झालंच पाहिजे... तुम्हाला काय वाटतं... ? बरोबर ना... ? (वेलजी मानेनेच हो म्हणतो... ) चला मग येतो मी. येतो बाय बाय... सी यु... नेक्स टाईम बोलूया आपण. आणि अगरबत्ती लावली का.. ? सुवास खूप छान आहे हा अगरबत्तीचा. आता रात्री नको. उद्या सकाळी लावा अगरबत्ती. चला येतो मी. (तो जातो. ती दरवाजा बंद करते. दरवाज्याची बेल वाजते. तो पुन्हा आत येतो. )

सेल्समन : कधी येऊ सोमवारी कि मंगळवारी... ?

मनोरमा : मंगळवारी या...

सेल्समन : ओके... (तो जातो. ती दरवाजा बंद करते. दरवाज्याची बेल वाजते. तो पुन्हा आत येतो. )

सेल्समन : सकाळी येऊ कि संध्याकाळी... ?

मनोरमा : संध्याकाळी या.

सेल्समन : ओके.. मग आपण मंगळवारी संध्याकाळी भेटू... येतो राजुसाहेब.... काका नको... बरोबर ना... चला पुन्हा भेटू... माझं नाव लक्षात ठेवा हा.. तसं माझं नाव तुमच्या काय घंटा लक्षात राहणार. चला येतो मी. (तो जातो. ती दरवाजा बंद करते. )

वेलजी : तुमच्या घरी काय कोणपण कोणत्या पण वक्ताला येतो काय.. ? आणि होता कोण हा... ?

मनोरमा : माहित नाही हो... सेल्समन होता.. पण खूप बडबड करतो ना. मघाशी तुम्ही यायच्या आधी आला होता. मघाशी पण असंच काहीतरी विचित्र बडबडत होता. असू दे असतात एक एक नग. थांबा मी मस्त गाणं लावते. (ती गाणं लावायला जात असते. परत येते. ) तुम्हाला एक गम्मत सांगू..? मी कॉलेजला होते ना तेव्हा माझी एक मैत्रीण होती मधुरा . खुप सुंदर होती दिसायला . तिचा आवाजही खूप गोड होता एकदा ना गंमत झाली . आमच्या कॉलेजचं फॅक्शन होतं आणि ती गायला स्टेजवर उभी राहीली . तेव्हाचा आणि आताचा योगायोग पहा . ती कोणतं गाणं गाणार होती माहितेय?

वेलजी ः कोणतं?

मनोरमा ः “केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली . ”

वेलजी ः अरे व्वा ?

मनोरमा ः अहो व्वा काय ? तिने काय गडबड केली माहितेय?

वेलजी ः काय ?

मनोरमा ः आता बघा. गाणं कसं आहे ‘ केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली......मिटले चुकून डोळे उलटून रात्र गेली. ’ आणि ती काय गायली माहितेय ?

वेलजी ः काय ?

मनोरमा ः “केव्हातरी पहाटे . . उलटून रात्र गेली......

चुकले मिटून डोळे . . उलटून रात्र गेली.........”

वेलजी ः मंग काय झाला ?

मनोरमा ः अहो काय झाला काय ? हीच तर गंमत होती. “मिटले चुकून डोळे”च्या ऐवजी ती चक्क “चुकले मिटून डोळे उलटून रात्र गेली. ” म्हणाली.

वेलजी ः मंग ?

मनोरमा ः अहो तुम्हांला हया शब्दांच्या पुढेमागे होण्यामुळे ओळीतला बदल नाही कळला?

वेलजी ः नाही. (ती त्याच्या कानात सांगते. तो मोठयाने हसतो. )

मनोरमा ः संपूर्ण हॉलमध्ये असाच हशा पिकला होता. बिच्चारी शरमेनं संपूर्ण गाणं न गाताच विंगेत पळाली आणि मग आठवडाभर कॉलेजला आलीच नाही. आजही तो किस्सा आठवला ना की खूप हसू येतं.

वेलजी ः मंग तो किस्सा नेहमी आठवून रोज हसत राहा. लय गोड स्माइल आहे तुमची. तुमचा नाव ना चंद्रमुखीच पायजे होता ?

मनोरमा ः तुमचं आपलं काहीतरीच हां ?

वेलजी ः आरे मी काय खोटा बोलते काय ? त्या चंद्रावर पन डाग आहे. पन तुम्ही.........?

मनोरमा ः माझ्यावरही.........

वेलजी ः काही नाही. तुमच्यावर कसलाच डाग बिग नाही. आता आपन दोघांनी फक्त हसायचं आनी हसवायचं.

मनोरमा ः कोणाला हसवायचं ?

वेलजी ः तुमी मला आनी मी तुमाला. मनोरमा तुझा आवाज पण किती चांगला आहे. (ती त्याचाकडे पाहते.) ए......, असा काय बघते तू.........?

मनोरमा ः अं...... काही नाही.

वेलजी ः हे बघ, आता आपल्यापासून काय बी लपवायचा नाय काय ? मी लपवला का काय बी ? माझ्या बायडीपासून, ते पोरापासून, ते बिझनेसपासून, ते माझे एअरकंडीशन धोतरपासून काय बी लपवला नाय ना. मंग. . . चल लवकर सांग मला काय झाला ?

मनोरमा ः तुमच्या तोंडून मनोरमा ऐकलं आणि तुम्ही चक्क मला अरेतुरे केलं.

वेलजी ः sorry, ते काय चुकून झाला. ते साला चामडयाचा तोंड हाय ना. आनी त्यात जिभेला पन हाड नाही. (ती त्याच्या जवळ बसून त्याच्या खांदयावर डोकं ठेवते. )

मनोरमा ः खूप बरं वाटलं. आज इतक्या वर्षांनी कुणीतरी आपलं आहे असंच वाटलं आणि सहजच स्वतःच्या डोळयात एक विलक्षण चमक जाणवली. पुन्हा खूप खूप जगावसं वाटायला लागलंय. खूप आनंदी रहावसं वाटायला लागलंय, कुणासाठी तरी शृंगार करावासा वाटायला लागलाय. (ती त्याच्याकडे पाहते.

तो तिच्याकडे पाहत असतो. ती लाजून जाऊन खिडकीत उभी राहते. तो तिच्या मागून जाऊन तिचे डोळे बंद करतो. )

वेलजी ః ओलख बघू कोण आहे मी?

मनोरमा ః (हसते. ) इश्श्य......, काहीतरीच काय करताय?

वेलजी ః (तिच्या डोळयांवरून हात काढीत.) मी कुठे काय केला?

मनोरमा ః अहो मला सांगा आता आपल्या दोघांशिवाय इथं तिसरं कुणी आहे का ? मी स्वतःच जर माझे डोळे मिटले नाहीत मग दुसरे तुम्हीच उरलात की.

वेलजी ః (हसत.) मी पन काय फालतू जोक करते ना ? लुकाछिपी खेळायला गेले पन साला विसरूनच गेले, लुकाछिपीसाठी कम से कम तीन जन पायजे. एSS, आपन दुसरा काय तरी खेळ खेळूया काय ?

मनोरमा ః अहो रात्रीचे बारा वाजता कोणता खेळ खेळूया ?

वेलजी ః बारा वाजला. एवढा टाइम झाला ?

ममोरमा ః तुमच्या भाषेत खूप टाइम खोटी झाला ना ?

वेलजी ః (हसत डोळा मारतो. ) जराबी टाइम खोटी झाला नाय. आता तू माझी बायडी आहे ना. चल इथे उभी राहा. मी तूला गरबा शिकवते.

मनोरमा ః रात्री बारा वाजता गरबा.

वेलजी ః कुठल्या पुस्तकामंदे लिवलाय काय, रात्री बारा वाजता गरबा खेळायचा नाय म्हणून.

मनोरमा ః अहो पण खालच्या मजल्यावरचे वर येतील ना ?

वेलजी ః माला टोपी नाय घालायचा. मी पहिलाच टोपी घालून आलाय. माला माहितेय

खालच्या रूमला कोनपन नाय राहते.

मनोरमा ः तुम्हांला कसं माहित ?

वेलजी ः हं......आपन गुजराती माणस आहे. येताना इकडे-तिकडे, सगळीकडे झाडी मारून आलाय. खालच्या रूमला टाळा लावलाय. आनी टाळा, आनी कडी, आनी दरवाजा एकदम खराब झालाय. एक-दोन वर्षामंदी कोनी उघडला पन नसेल दरवाजा.

मनोरमा ः अरे बापरे, काय पण डोकं आहे तुमचं. किती किती आणि काय काय विचार करून आलायत.

वेलजी ः मंग, उगाच नाय हे (डोक्यावरून टोपी काढून हात फिरवितो. ) केस उडाले. डोक्यामंदी विचाराला जागा पायजे म्हणून केसानी खुद-ब-खुद आपली जागा खाली केली. (ती मोठयाने हसते. ) ए SS, तुला आजून एक गंमत सांगते. पयलांदा माझा आधा चांद होता. म्हणजे अर्धा टक्कल. तेवा आमची बायडी गाना म्हनायची. "आधा है चंद्रमा रात आधी......रहना जाए तेरी मेरी बात आधी......

मनोरमा ः (हसते. ) आणि आता काय म्हणतात त्या?

वेलजी ः खोया खोया चांद, खुला आसमां...

मनोरमा ः (पुन्हा हसते. ) तुम्ही म्हणजे ना एकदमच......

वेलजी ः बास......जास्त नाय बोलायचा. चला इथे उभा राहायचा, हा असा वाकायचा आनी हा असा नाचायचा. हा स्टार्ट......

मनोरमा ः अहो नाही मला खरंच नाही जमणार......

वेलजी ः नाय काय जमनार. मी देते ना ट्रेनिंग. (तिला हात पकडून आणून उभी करतो.) हा आता पाया बरोबर टाळया वाजवायच्या.

मनोरमा ः पायांनी......?

वेलजी ः आमच्यात टाळया हातानी वाजवतात. तुम्ही लोकं पायानी वाजवता काय ? (ती हसते) टाइम खोटी नाय करायचा. गप इथे नाचायला उभा राहायचा. हा, आता मी नाचते तसा नाचायचा. (तो गाणे गात नाचू लागतो. ) कुकडी तारी बोली मने मिठी मिठी लागे. हा कुकडी तारी......मिठी लागे. (दोघे नाचतात. तो दमतो व जाऊन सोफ्यावर घाम पुसत बसतो.) कसा काय? मजा आला ना एकदम नाचायला.

मनोरमा ः मजा म्हणजे खूपच मजा आली बघा. तुम्ही तर धमाल उडविली

नुसती. किती छान नाचता ओ तुम्ही.

वेलजी ः मंग, आमी गुजराती लोक नाचायचे पन खूप शौकीन असते. ते फाल्गुनी पाठकचा दांडीया असते ना. तेवा तर मी इतका नाचते, इतका नाचते की काय सांगणार कितका नाचते.

ंनोरमा ः काहीही सांगायची गरज नाही. आताच मी तुमच्या नाचाचं एक भन्नाट प्रात्यक्षिक पाहिलं.

वेलजी ः कवां कवां तुनी एवढा जड जड शब्द वापरते ना बोलताना की त्येच्यावर गौर

करताना माझ्या बी नाकी नऊ येते.

मनोरमा ः अच्छा...... पण तुम्ही देखील कवां कवां मराठीतले जड शब्द वापरता हां.

वेलजी ः असा शब्दात नाय पकडायचा. आधी माला सांगा. सर्वच ब्राम्हन लोकांना सरळ समजेल असा बोलायचा सोडून वेडावाकडा शब्द वापरायचा बिमारी असते काय? की तुमी लोक किती Brilliant आहे ते सगळयांना दाखवित असते?

मनोरमा ः असं काही नाही हा. आमच्यावर लहानपणापासूनच स्वच्छ राहण्याचे, शुध्द बोलण्याचे संस्कार झालेले असतात. आणि आम्हा सर्व ब्राम्हणांना ते मनापासून आवडतात. टापटीप राहणं, स्वच्छ कपडे घालणं, शुध्द आणि दर्जेदार

विषयांवर बोलणं. पौष्टीक शाकाहार घेणं आणि भगवंताच्या भक्तीत रमून जाणं

वेलजी ः बास......, आपण टॉपिक चेन्ज करूया. माला "मराठी ब्राम्हण" या विषयावर Phd नाय करायचाय. (ती हसते. तो तिच्याकडे पाहत तिच्याजवळ सरकतो. तिच्या ओठांजवळ स्वतःचे ओठ आणतो आणि टेलिफोनची बेल वाजते. )

वेलजी ः (घडयाळात पाहत) तुमाला असा कवापन फोन येते काय?

मनोरमा ः (हसून.) राजूचा फोन असेल ? थांबा मी पाहते.

वेलजी ः साला कवांपन फोन करते. तू साला उदया भेट माला.

मनोरमा ः (फोनवर.) हॅलो......हा राजू...... नाही काही प्रॉब्लेम नाही.

वेलजी ः एक मिनिट...... (फोनवर) ए राजू , रातचे ढाई वाजता फोन करते तू. टुला काय झोप बिप हाय की नाय ऑ......? साला लोक रातच्या ढाई वाजता आराम करते आनी तू......काय. . ? मॅच...... रातच्याला झोपायच्या टाइमाला तू मॅच बघते. म्हणजे काय ते मॅचमंदी पानी बिनी येते तेव्हा तू काय इथे फोन करते . साला जेवा सिक्सर मारायचा टाइम येते तू मध्येच कडमते. आं......अरे, कसा चाललाय म्हणून काय विचारते. चालायला साला तू टाइम देल तेवा सगळा चालेल ना. आरे मी काय इथे तुझ्या मॅडमला खाऊन नाय टाकते. प्युअरली वेजिटेरियन हाय मी. कळला काय? चल, आता जास्त पुढे पुढे नाय बोलायचा. चल ठेव फोन खाली. आनी आता डायरेक्ट सकाळी फोन करायचा. कळला काय? ठेव फोन. (वेलजी रिसीव्हर ठेवतो. ) साला हर टाइमाला मुडची वाट लावते. आता ना मी रिसीव्हरच बाजूला ठेवते. मग बसू दे बोंबलत. (रिसीव्हर बाजूला ठेवतो.) तू काय फिदी फिदी हसते. एवढया रात्री काय, तर मॅच बघत होता. मॅच क्रिकेट मॅच. पन साला सगळया गोष्टींसाठी टाइमिंग असते. पन ही क्रिकेटची मॅच कधीपन चालते. साला,

काम करायला कोन बी नाय जागरन करनार . पन मॅचला रात्री सगळयांची झोप कुठे गायब होते . कोणत्या पण देशाची मॅच असो, लोक मॅच बघायला जागरन करनारच. या क्रिकेट मॅच पाय आपला देश मागे हाय माहितेय? ते वर्ल्डकप टेवन्टी-टेवन्टी फायनल मॅच होता ना पाकिस्तान बरोबर साला डायमंड मार्केट आधीच बंद . रस्त्यावर कुत्राबी नाय . साला घरी पोचला. बायडीने पानी बी पियाला नाय दिला . घरी कामाचा वार्ता कमी, त्या धोनीच्या बालची वार्ता जास्त . एक दिवस धोनीच्या डोक्यावर एकपन बाल राहनार नाय . त्येचापन माझे सारखाच उजडे चमन होईल . मी प्राइमिनिस्टरला लेटरचं लिवनार होता . क्रिकेट मॅच बंद करा म्हणून . पन साला ते धोनी वर्ल्डकप घेऊन आला ना . मग माझा प्लान बदलला . साला आमीबी रात्रभर धमाल केला . पन मजा आला हा नाचायला इंडिया वर्ल्डकप जिंकला तेवा . आणि परत इंडिया जेव्हा ‘ वन डे ’ वल्ड कप जिंकला ना तेवा तर...

मनोरमा ः म्हणजे...... तेव्हा तुमी नाचला होतात कि काय ?

वेलजी ः मंग......, नुसताच नाचला नाय . मी एवढा नाचला, एवढा नाचला की काय बोलू केवढा नाचला .

मनोरमा ः तुम्ही गरवा नाचलात की दांडीया ?

वेलजी ः (कपाळावर हात मारीत . ) गुजराती माणस असला तर काय गरबा नाय तर दांडीयाच नाचते काय ? ते काय ते गाना होता हा “उसने बोला केम छे, केम छे, केम छे......” त्येच्यामंदी ती काय गरबा खेळत होती की दांडीया आनी “ दिल ले गई कुडी गुजरातनी मधी काय बिकीनी वर गरबा चालला होता .

मनोरमा ः (हसत . ) अहो, या . . थोड शांत बसा इथं . किती बडबड कराल?

वेलजी ः ते राजू कवां बी फोन करणार ते बराबर . आनी आमी बोलते ते बडबड करते काय ? (तो तोंड फिरवून बसतो . )

मनोरमा : अरे बापरे, एक माणूस रागवलं वाटतं आमच्यावर. हे पहा, अहो कान पकडते मी Sorry..... please..... चला, आता एका आदर्श बायकोप्रमाणे मी तुमची समजूत काढू का ? मी गाणं गाऊ ? केम छे......केम छे......गाणं पण नको ? मग रेकॉर्ड लावू ? केव्हातरी पहाटे गाणं......मग ती मधुराची "चुकले मिटून डोळे"ची गंमत आठवून तुम्ही नक्कीच हसाल. अहो असं काय करताय. किती समजूत काढायची तुमची. अहो मी तुमची कायमची नाही. फक्त आजच्या एका रात्रीचीच बायको आहे हो. (तो वळून तिच्याकडे पाहतो.) तुमच्याबरोबर वेळ कसा गेला कळलंच नाही आणि आता रात्रही उलटून चाललेय. पण खूप आवडला तुमचा सहवास. आजच्या एका रात्रीत गेल्या दोन वर्षांचं दुःख कुठल्याकुठं नाहीसं झालं. आयुष्य म्हणजे एक सुखद अनुभुती असते. आपण ठरविलं तर नीरस जीवनही आल्हाददायक ठरू शकतं हे पटलं. असो, आता फक्त काहीच तास आपण बरोबर आहोत. तेव्हा असं दोन ठिकाणी तोंड करण्यापेक्षा तुम्ही झालं गेलं ते विसरून जा. आणि हो...... (टेबलच्या ड्रॉवरमधून दहा हजाराचं बंडल काढून त्याला देत. ) हे तुमचे पैसे. मानसिक आधार हा पैशांपेक्षा मोठा असतो हो. (पदराने डोळे पुसते. तो पैसे बाजूला सोफ्यावर ठेवतो.)

वेलजी : ए मनोरमा, अरे मी सचमुचचा रागावला नव्हतो. ते असाच आपला गंमत. एरडायचा नाय. आनी किती बडा बडा डायलॉग मारते. साला थोडा डोक्याच्या वरून गेला आनी थोडा डोक्यावरून घसरला. ते तू डोक्याला तेल लावला होता ना. (ती हसते. ) 'अरे हंसी तो फंसी. ' मंग आपला डायलॉगपन सरस होता की नाय. मंग आपन पन बेस्ट ॲक्टर हाय की नाय. एकदम परेश रावल. परेश आणि वेलजी बन्ने गुज्जुभाई. आनी दोघेबी उजडे चमन. (ती हसत डोळे पुसत असते. तो तिच्या जवळ येतो. तिला जवळ घेतो. ती त्याच्या खांदयावर डोकं ठेवते. ) मी पन आजची रात्र एक वेगळाच जिंदगी जगला. साला, आपला जिंदगी म्हणजे सच्ची देवाची देन हाय. देवानं दिलेला खूबसूरत गिफ्ट हाय. पन आपन जिंदगी जगतच नाय. आपन साला

नेहमी स्वतःच स्वतःला टेन्शनमधे टाकते. मनोरमा, आपन उदया पिक्चर बघायला जायचा? प्लीज, नाय बोलायचा काम नाय. उदया मल्टिप्लेक्समंदी जायचा पिक्चर बघायचा, पॉपकॉर्न खायचा. मंग आपन मोठया हॉटेलमंदी जेवायचा. संध्याकाळी जूहू बीचला जायचा. एकदम धमाल करायचा.

मनोरमा : चला, तुमचं आपलं काहीतरीच हा आणि हो मी अशी नऊवारीवाली तुमच्या मल्टिप्लेक्समध्ये. सगळे हसतील तुम्हांला.

वेलजी : चल तू उदया फिरायला. मी पन बघते कोन हसते माझेवर. (तिला जवळ घेत..) मी काय कोनाच्या बापाला पन नाय घाबरते काय ? (तेवढयात दरवाजा उघडतो व इन्स्पे. शृंगारपुरे आत येतो. त्याला पाहून दोघेही घाबरतात.)

## पहिला अंक समाप्त.

# अंक दुसरा

(इन्स्पे. शृंगारपुरे दरवाजा उघडतो. )

इन्स्पे. ः शृंगारपुरे...... (दोघेही इन्स्पेक्टरला पाहताच दोन दिशेला जातात.) शृंगारपुरे. मी PSI राजधन शृंगारपुरे. गावदेवी पोलीस स्टेशन. sorry, म्हणजे एकदम नको त्या वेळी आलो ना. तुम्ही लोकं ओळखता मला? (दोघे मानेनं नाही म्हणतता.) नाय. मग तुम्ही मकरंद अनासपुरेला ओळखता ना. (तो नाही म्हणतो. ती हो म्हणते. वेलजी जवळ जात.) तुम्ही नाय ओळखत मक्याला? आणि बाई तुम्ही ओळखता मक्याला? (ती मानेने हो म्हणते.) मग तुमच्याशी बोलणं जास्त सोयीचं त्याचं काय, मी आणि मक्या आम्ही दोघे एकाच गावचे. शालेय शिक्षण पण एकत्रच घेतलं. दोघांची गर्लफेंड पण एकच होती शाळेत. म्हणजे आमच्या वर्गात एकच पोरगी होती आणि ती फक्त आमचीच मैत्रीण होती. तिच्याशी कोण बोलला रे बोलला की मी आणि मक्या आम्ही दोघेबी खूप चोपायचो त्याला. आता तो पिक्चरमध्ये खोटया गुंडांना चोपतो आणि मी पोलीस स्टेशनात ख-या गुंडांना. आम्ही एकदम खास मित्र हा फरक एकच तो अनासपुरे आणि मी शृंगारपुरे. काय...... आता मी माझी ओळख करून दिलेली आहे. आता तुम्ही. (तो तिच्याकडे येतो.) आपली ओळख.

मनोरमा ः मी, मी मनोरमा सह......सहस्त्रबुध्दे. (ती केस व्यवस्थित करीत असते. )

इन्स्पे. ः शृंगार......पुरे. (ती केसांवरचा हात काढून त्याच्याकडे पाहते.) तुम्ही काय ते केस सरळ करा. मी म्हंटलं, मी शृंगारपुरे. (वेलजी जवळ जात. ) आता आपली ओळख?

वेलजी ः मी ते वेलजीभाई पटेल असते.

इन्स्पे. ः ते वेलजीभाई पटेल असते? (त्याला समजावित.) काय......मराठी बोलताना ते चा वापर नपुंसक लिंगात होतो. ते हा शब्द गाळलात तरी चालेल. काय...... लोकांचा उगाच गैरसमज नको. (हसतो.) अहो मी विनोद केला. विनोद ऐकल्यावर थोडं हसायच असतं. (वेलजी हसण्याचा प्रयत्न करतो.) अहो......मी पैसे नाही मागितले हो तुमच्याकडे. हसायला पण इतकी कंजूषी. बरोबर. . , पटेल ना तुम्ही ? वेलजीभाई पटेल. म्हणजे गुज्जू ना ?

वेलजी ः हो.

इन्स्पे. ः मग, मी कसं काय ओळखलं. त्याचं काय आहे. आमच्या पोलीस स्टेशनातला मी सर्वांमध्ये सुरस...... म्हणजे सरस, कर्तव्यदक्ष आणि इनामदार......इमानदार अधिकारी आहे. लाच घेणं हे आमच्या चालीत बसत नाही. दगडी चाळीत राहतो मी. (दोघे त्याच्याकडे पाहतात. ) म्हणजे, मी ज्या चाळीत राहतो ना, ती इंग्रजांच्या वेळेची दगडांची चाळ आहे. ती दगडी चाळ नाही काही. उगाच गैर समज नको. पोलीस सब इन्स्पेक्टर आणि पत्ता दगडी चाळ. (हसतो. वेलजीकडे पाहतो. वेलजी मोठयाने हसतो. ) तुम्हाला विनोद कळला ? बरं वाटलं मला. तर आता पुढे. म्हणजे बघा. सस्पेन्स, तणाव निवळलेला आहे. कुणीतरी म्हंटलय ना, विनोदाने वातावरण कसं प्रसन्न होतं. तर आता वातावरण प्रसन्न झालेलं आहे. आता आपण जरा काामाचं बोलू. म्हणजे काय...... फारसे काही प्रश्न नाही विचारायचेयत मला. पहिला प्रश्न. सहस्त्र......बुध्दे... किती अवघड आडनावं ठेवता हो. हा, तर सहस्त्रबुध्दे आणि पटेल यांची युती मघाशी आम्ही पाहिली या इथं. या पोझमध्ये. (ते

इन्स्पे. येतो तेव्हा जसे उभे असतात. तसा तो उभा राहून दाखवितो. ) ते म्हणजे कसं काय ते कळलं नाही बुवा आपल्याला.

मनोरमा ः हे पहा साहेब, रात्रीचे साडेतीन वाजता तुम्ही एखादया घराचा दरवाजा उघडून सरळ आत येणं कायदयाने गुन्हा आहे.

इन्स्पे. ः कोणत्या लॉ कॉलेजला होता हो तुम्ही ?

वेलजी ः हे बघा इन्स्पेक्टर साहेब.

इन्स्पे. ः दाखवा. काय दाखवताय काय मला. हया कायदा शिकवतायत आणि तुम्ही काय दाखवताय चायनामेन. (ॲक्टींग करून चायनामेन सारखा उभा राहतो.) ओ सहस्त्र......आयला हे आडनाव पण ना. नाव काय तुमचं म्हणाला होतात?

मनोरमा ः मनोरमा सहस्त्रबुध्दे.

इन्स्पे. ः मनोरमा पर्यंत ठीक आहे. पुढचं ते कठीण आडनाव राहू देत. हा, तर मनोरमाबाई.

वेलजी ः मी काय म्हणते इन्स्पेक्टर साहेब. .

इन्स्पे. ः तुम्ही उगाच कशाला करताय घाई. मी येतो ना थोडया वेळाने तुमच्याकडे. जा जरा तिथे एका जागी शहाण्या, गोंडस मुलासारखे गप्प बसा. (तो जाऊन बसतो.) बसलात. धन्यवाद. मंडळ आभारी आहे. थोडया वेळाने आपण तुमच्या सत्कार सोहळयाचा समारंभ साजरा करू. तर मनोरमाबाई बोला काय म्हणत होतात तुम्ही. काय तो साडेतीन वाजताचा कायदा. लवकर बोला. तीन चाळीस झाले.

मनोरमा ः एका एकटया बाईच्या घरी एवढया रात्री तुम्ही......

इन्स्पे. ः अहो, मी काय जेवायला आलो नाही हो तुमच्याकडे. बारा नंतर जेवण

मिळणार नाही. आम्हांला बंद झालेल्या चायनीजच्या गाडया रात्री दोन वाजता पण उघडायची सवय आहे. हा तर तुम्ही काय म्हणालात, "एकटया बाईच्या घरी" म्हणजे "एकटी बाई" म्हणजे "एकटी"म्हणजे तुम्ही. मग हया एकटया बाईच्या घरी हा दुकटा कोण ?

वेलजी ः म्हणजे बघा इन्स्पेक्टर साहेब.

इन्स्पे. ः तुमच्याकडे बघण्यासारखं काही आहे का? सारखं बघायला सांगतायत.जा आणि तिकडे गप्प बसा. मला काय...... प्रत्येक केस विनोद करीत सॉल्व्ह करायला आवडते. उगाच बांबू काढायला लावू नका मला. हा, मनोरमाबाई बोला. तुम्ही बोला. काय, काय ऑब्जेक्शन आहे ना तुमचं ते सांगा आणि माझ्या त्याच त्याच प्रश्नाचं उत्तर पण दया. तो तिथं बसलाय ना तो चायनामॅन कोण ?

मनोरमा ः ते नातेवाईक आहेत माझे.

इन्स्पे. ः नातेवाईक. हिंदी-चीनी भाई भाई. तुम्ही मराठी, हे गुजराती मग तुम्ही नातेवाइक कसे ? चेह-याने वाटत असलो तरी एवढा पण खुळा नाही आहे हो मी. चला, पटापट काय भानगड आहे ते सांगून टाका.

वेलजी ः मी काय म्हणते......

इन्स्पे. ः बांबू काढू काय? (तो गप्प जागेवर बसतो. इन्स्पे. तिच्या जवळ जातो. तिच्याकडे पाहत तिच्या भोवती एक चक्कर मारतो आणि वेलजी जवळ येतो. वेलजी स्तब्ध बसलेला.) हं ......आता तुम्ही. (वेलजी डोळे गच्च मिटतो.) अरे उठा. रात्रभर जागे होतात. आता सकाळ होत आली डोळे उघडा. गेलेबिले नाही ना. ओ SS......(तो उठून उभा राहतो. ) हा, आता तुम्ही बोला. च्या आयला, हा कोणत्या ग्रहावरचा प्राणी आहे हो. जेव्हा मी याला गप्प बसायला सांगतो, तेव्हा हा बोलतो आणि जेव्हा मी याला बोलायला सांगतो तेव्हा याचा चायनामेन होतो. आता बोल नायतर मी बांबूच काढतो.

वेलजी ः मी वेलजीभाई पटेल.

इन्स्पे. ः ते मला पटेल. म्हणजे पटलं. ते मला पटलं. पुढे, तुमचं दोघांचं काय नातं आहे ते सांगा. तुम्ही या बाईंचे कोण? म्हणजे काका, मामा, आजोबा, पणजोबा, खापरपणजोबा.. आता याच्यावर नाती मला कळत नाहीत हा. लवकर सांगा नायतर बांबूच..

वेलजी ः (लगेच.) नाय मी काय नाय केला. मी ते असाच हाय बोलायला आला होता. आमच्यात तसा काय बी झाला नाय?

इन्स्पे. ः हा पक्का गुजराती आहे हा. बांबू बोलला की लगेच पोपटासारखा बोलतो. दांडीया बहादद्र असतात ना हे. (हसतो.) हा विनोद दोघांनाही कळला नसेल. दोघेपण एकदम घामाघूम. म्हणजे काहीतरी लफडा आहेच. बाई तुम्ही म्हणता, तुम्ही सहस्त्र......जे काय तुमचं आडनाव आहे. म्हणजे तुम्ही मराठी ब्राम्हण, हे पटेल म्हणजे गुजराती. तुम्ही इथं एकटयाच राहता, हे तुम्हांला हाय बोलायला आले होते. मी आलो, तेव्हा तुम्ही दोघं या इथं. या अशा पोझमध्ये उभे. आता मला सांगा. ही नक्की भानगड तरी काय? हे तुमचं दोघांचं असं कुठलं नातं आहे ते मला पटेल असं सांगा. एक काम करा. आधी तुम्ही दोघांनी चेह-यावरचा घाम पूसा. मी इथे बसू. (सोफ्यावर बसतो) धन्यवाद. (त्याचा हात दहा हजाराच्या पाकीटावर पडतो. पाकीट खोलून तो पैसे बघतो. ) एवढे पैसे ? आता हे पैसे कोणाचे मनोरमाबाई तुमचे की हयांचे की दोघांचे. असं तर नाही ना की दोघांच पैशांचं नात आहे. दोघांनी पुन्हा एकदा घाम पुसा. मी काय म्हणतो मनोरमाबाई तुम्ही ओटीयंट pspoचा पंखा लावा. छान हवा लागते. घाम पण कमी येतो. (वेलजीला. ) माहीतेय तुम्हांला ? (वेलजी मानेनं नाही म्हणतो.) ये pspo नही जानता. तुम्ही कुठे राहता हो?

वेलजी ः घरात.

इन्स्पे. ः मग आम्ही काय झाडावर राहतो का ? मी विचारलं कोणत्या एरियात राहता?

वेलजी ः दामजीभाई लेन मंदी. पटेल हाऊस.

इन्स्पे. ः दामजीभाई लेन. कुठे आली ही ?

वेलजी ः खेमजीभाई लेनच्या बाजूला.

इन्स्पे. ः अच्छा. आणि ही खेमजीभाई लेन कुठे आली?

वेलजी ः भीमजीभाई लेनच्या बाजूला.

इन्स्पे. ः काय......, तुमच्याकडे तुमच्या घराचा नकाशा असेल ना तर दया. मीच शोधतो तुमचं घर. (वेलजी हसतो. ) हसताय कशाला. हा काय विनोद नव्हता. मला तुमचा पत्ता सांगा. कोणत्या एरियात राहता तुम्ही. गिरगांव, दादर, बांद्रा, कुर्ला, घाटकोपर, ठाणे.

वेलजी ः मी मुंबईला नाय राहते.

इन्स्पे. ः मग कुठे नवी मुंबई, पनवेल, विरार कुठे?

वेलजी ः मी इथे पन नाय राहते.

इन्स्पे. ः हा येडा हाय काय ? अरे मी इथे काय इस्टेट एजंटचा धंदा खोलून बसलोय काय ? आता सरळ सांगतोस की बांबू काढू.

वेलजी ः अहमदाबादला.

इन्स्पे. ः अहमदाबाद...... म्हणजे गुजरातवरून हाय बोलायला मुंबईला. ते पण रात्री साडेतीन वाजता. ट्रेन लेट आली काय ? बरं, हे एवढे पैसे कोणाचे? (मनोरमा वेलजी एकमेकांकडे पाहतात) असो, तुमचे दोघांचे नसतील तर काहीच प्रॉब्लेम नाही. मी माझ्याकडे ठेवतो. असे काय पाहताय माझ्याकडे ? मी म्हंटल म्हणजे आता माझ्याकडे ठेवतो आणि नंतर पोलीस स्टेशनात जमा करतो. आता तुमचं नाही म्हंटल्यावर सरकारचं धन आहे ना ते. आता गंमत

बघा ना. माझं नाव राजधन शृंगारपुरे. राजधन.. , नावात राज असून आतापर्यंत काहीच नवनिर्माण करू शकलो नाही. आणि धनाच्या नावाने बोंबच. बसा, बसा तुम्ही दोघेही बसा. काय, आता प्राथमिक चर्चा संपलेली आहे. आता आपण मूळ मुददयाकडे वळू. बाईंचा मघाचचा प्रश्न. रात्री साडेतीन वाजता मी या एकटया बाईच्या घरी कसा? तो पण दरवाजा ढकलून. आता दरवाजा लॉक न करता तुम्ही दोघे या इथं, या पोझिशनमध्ये राहता. त्यात आपला काय दोष आहे काय? असो, to the point बोलतो आता. ओ चायनामेन...... आपलं, पटेल साहेब तुम्ही जरा दोन्ही कान खोलून ऐका. हार्ट अटॅक, ब्लडप्रेशर असा काही रोग नाही ना तुम्हांला?

वेलजी ः माला डायबेटीस असते.

इन्स्पे. ः (समोरची जिलेबी उचलत. ) मग ही जिलेबी कोण खात होतं.

वेलजी ः त्याचं काय साहेब, मला जलेबी लय आवडते.

इन्स्पे. ः मला पण. फ्रेश आहे ना जिलेबी. खाऊ शकतो ना मी. अरे वा, ढोकला आनी कचोरी पण.

वेलजी ः अरे खाना साहेब. त्येच्यामंदी काय विचारायचा.

इन्स्पे. ः (जिलेबी खात.) व्वा. झक्कास. जिलेबी ना मला खूप आवडते हो. जिलेबी गरम असली ना की अजून मजा वाटते खायला. तुम्ही खाणार थोडी. (वेलजी मानेनं नाही म्हणतो.) बाई तुम्हांला

मनोरमा ः अ......नको.

इन्स्पे. ः पाणी मिळेल काय ओ थोडं.

मनोरमा ः आणते. (ती जाऊन पाणी आणते व त्याला देते. )

इन्स्पे. ः (पाणी पितो. ) मजा आली. (ढेकर देतो. ) कुठून आणली ओ.

वेलजी : ते आपला चर्नीरोडचा पंचरत्न आहे ना, डायमंड मार्केटजवळ तिथून. लय फेमस हाय तिथले सगळे आयटम.

इन्स्पे. : तरीच बोललो. टेस्ट ओळखीची वाटते. (खिशातून टूथपिक काढून दात साफ करू लागतो.) हा तर मी काय म्हणत होतो.

वेलजी : ते तुम्हांला जलेबी लय आवडते.

इन्स्पे. : ती संपली. आता जिलेबीची फाईल क्लोज. हा, मी एवढया रात्री इथे का आलो. काही दिवसांपूर्वी आमच्याकडे एक पक्की खबर आली. खबर अशी आहे की, इथे या घरात धंदा चालतो. (दोघेही इन्स्पे. कडे वळतात.) काय मनोरमाबाई या बाबत आपल्याला काही बोलायचं आहे का? मी गेले कित्येक रात्री या घरावर वॉच ठेवून होतो. आज रंगेहाथ पकडायचा चान्स आला आणि म्हणूनच रात्री साडेतीन वाजता येऊन, तुमचा उघडाच असलेला दरवाजा उघडला. तर समोर एकदम आशिकीचीच पोझ. त्यात तुम्ही मराठी ब्राम्हण, हे गुजराती. तुमच्या नात्याची भानगड आपल्याला अजून काय ती कळलेली नाही. आणि सोफ्यावर हे इतके पैसे. साला चोवीस तास घासतो हो आम्ही. पण एवढे पैसे कधीच बघायला मिळत नाहीत. आणि तुमच्या घरात डायरेक्ट बंडल. असा कोणता बरे व्यवसाय करता आपण, जरा आम्हांला कळेल का?

मनोरमा : साहेब, मी एक गरीब विधवा बाई. तुमचा काहीतरी गैरसमज होतोय हो.

इन्स्पे. : हो, असेल. झालाही असेल माझा गैरसमज. पण या गरीब विधवा बाईच्या कपाळावर एवढं मोठं कुंकू आणि गळयात हे मंगळसूत्र......?

मनोरमा : कुंकू आणि मंगळसूत्र ही सौभाग्याची खुण आहे साहेब. एकटी विधवा बाई म्हंटलं की सगळे लाळ घोटत बाजूला घुटमळू लागतात. साहेब, मदत कुणी करीत नाही हो, पण मदतीचं नाटक मात्र करताना शरीराला सारखा स्पर्श

करण्याचा केविलवाणा प्रयत्न असतो प्रत्येकाचा. (तिच्या खांदयावर हात ठेवत असतो. पण लगेच हात मागे घेतो.)

वेलजी : साहेब, जर आमच्या दोघांकडून चूक झाली असणार तर आमी माफी मागते साहेब. आमी दोघेबी घरंदाज लोक असते साहेब. मी काय म्हणते साहेब, जरा इकडे येते काय तुमी. थोडा प्राइव्हेट बोलायचा होता.

इन्स्पे. : ओ SS भाऊ, आपण होमियोपॅथिक नाही आहे हा. खाय ? कोप-यात कशासाठी? तू डायरेक्ट इन्स्पेक्टरलाच कोपच्यात बोलावतो.

वेलजी : तसा नाय साहेब, ते तुमच्याशी थोडा व्यवहाराचा बोलायचा..

इन्स्पे. : व्यवहार......व्यवहार? अरे गुजराती माणसा. तू या मर्द मराठी माणसाबरोबर व्यवहार करणार. धंदा करणार. थांब तूला ना आता धंदयालाच लावतो.

वेलजी : तसा नाय. अहो मी ते तुमच्या फायदयाचीच गोष्ट बोलतेय. ते तुमी बोलला ना तुमचे नोकरी बदद्ल. मी काय म्हणते ते पाकीटात दहा हजार रूपये आहे. मी तुमाला आजून दहा हजार रूपये देते, काय? आता तुमी मोठे साहेब हाय. ते काय ते घ्या तुमी समजून.

इन्स्पे. : डायरेक्ट point वर आलात. पण काय ना पटेल साहेब, मी पैसे खात नाही हो. लाच खाणं हा कायदयानं गुन्हा आहे. काय बाई बरोबर बोलतोय ना मी आणि... या दहा आणि तुम्ही आजून दहा देताय ना? हा, तर या वीस हजारासाठी म्हणजे मी, माझी नोकरी पणाला लावायची म्हणजे. अरे तुम्ही उभे का? बसा ना. काय......व्यवहाराच्या गोष्टी उभ्याने करायच्या नसतात. बसा.. आपण बसून बोलू. काय......मी आलो होतो, तेव्हा मी बोललो होतो की नाही की, मी सरस आहे...... एवढा वेळ तुम्ही माझ्या बरोबर आहात. मग, मी वाटलो की नाही सरस.

वेलजी : हे काय विचारणं झालं काय साहेब. तुम्ही सरसच असते.

इन्स्पे. ः मी असंही म्हणालो होतो की मी कर्तव्यदक्ष आहे म्हणून. एवढया वेळात तुम्हांला माझ्या कर्तव्यात काही कसूर दिसली का ? नाही सांगा, दिसली का कसूर. मी कर्तव्यदक्ष आहे की नाही ?

वेलजी ः हे काय विचारणं झालं काय साहेब, तुम्ही कर्तव्यदक्षच असते.

इन्स्पे. ः कसं आहे. आम्हां पोलिसांबदद्ल कुणी positive बोलतच नाही हो. सगळे आम्हांला चिरीमिरीच समजतात. अहो, खूप प्रॉब्लेम होतो हो आमचा. साला, बायकोला ओरडायला गेलं तरी वीस रूपये हातावर ठेवून पुढे होते. आता मला सांगा. मी मघाशीच आलोय. आलो की नाही? सगळं लफडं शोधून काढलं की नाही. पण मला सांगा. मी स्वतःहून तुमच्याकडे पैसे मागितले का? मग मला सांगा मी इमानदार आहे की नाही?

वेलजी ः हे काय, विचारणं झालं का साहेब. मी म्हणते ना, तुमी इमानदारच असते.

इन्स्पे. ः तुमचा व्याकरणाचा खूप घोळ आहे हो. तुम्ही सारखं असते, असते म्हणता. स्वतःबद्ल बोलताना पण असते आणि माझ्याबदद्ल बोलताना पण असते. त्यात मला कोपच्यात बोलावता. काय......तुमच्या हया अशा बोलण्यानं आणि वागण्यानं थोडा गैरसमज निर्माण होतो.

वेलजी ः त्येचा काय साहेब. आमचा मराठीवर लय जीव हाय ओ. पन काय जेनु काम तेने थाय, अने बिजा करे जो गोता खाय. असा सगळा हाय ना.

इन्स्पे. ः तुम्ही चुकीचं व्याकरण वापरत मराठी बोललात तरी चालेल. माझा गुजराती बोलायचा सगळाच प्रॉब्लेम आहे. ओ बाई, थोडं पाणी मिळेल काय हो ?

मनोरमा ः चहा ठेवू का तुमच्यासाठी. . ?

इन्स्पे. ः ऑ......नाही नको. चहा फराळाचं नंतर दिवाळीला पाहू. सध्या थोडं पाणी पाजा. (ती पाणी आणायला जाते. ) खूप गर्मी आहे ना. त्यात हया पंख्याची पण हवा कमी. (ती पाणी आणते. )

मनोरमा ः पाणी .

इन्स्पे . ः हो पाणी...... (पाणी पितो . ती ग्लास घेऊन जाते . ) हा, आता कसं थोडं बरं वाटलं . (ती पुन्हा येते . ) माठातलं पाणी होतं ना?

मनोरमा ः हो .

इन्स्पे . ः मघाशी पण माठातलंच पाणी दिलंत?

मनोरमा ः हो .

इन्स्पे . ः छान . छान होतं माठातलं पाणी . फ्रीज नाही तुमच्याकडे?

मनोरमा ः आमच्यासारख्या गरीबाला कुठे परवडणार हो फ्रीज . आमचा माठ म्हणजेच आमचा फ्रीज .

इन्स्पे . ः व्हेरी गुड . यू आर राइट . तुमच्या सोफ्यावर दहा हजाराची कॅश, अशी बेवारश्यासारखी पडलेली होती . या......या इथं . अहो माझ्याघरी चिल्लर पण नाही सापडत हो, किती किती शोधलं तरी .

वेलजी ः मी काय म्हणते इन्स्पे . साहेब . काय, आपण सगळे चांगले लोक . काय ते एकमेकाला समजून घेऊ . मी काय म्हणते .

इन्स्पे . ः म्हणते? नाही बोला . चालेल . असते, म्हणते . आता अशा व्याकरणाची सवय झालेय मला . बोला तुम्ही .

वेलजी ः मी दहा प्लस दहा . वीस देत होते ना तुम्हांला . अजून टेन ॲड करते . डहा प्लस वीस म्हणजे तीस . टोटल तीस हजार . हा आनी आता काय बी बोलायचा काम नाय . हे तीस काय रिश्वत नाय काय . माला माहीत असते तुम्ही इमानदारच असते . हे या भावाकडून गिफ्ट म्हनून ठेवायचा . आनी मी पन देवाशपथ सांगते . माझ्या आनी मनूमध्ये काहीच......... (इन्स्पे . वेलजीकडे

पाहतो.) आय मीन माझ्या आनी मनोरमाबाईमध्ये तसा काहीच झालेला नाही आहे. मी पुन्हा लाईफमंदी कधीबी इकडे नाय येनार...

इन्स्पे. : एक मिनिट. मी तुम्हांला बोललो काय की तुम्ही इकडे कधी येऊ नका म्हणून...... मग......? मी आलो. तुमची देघांची रूटीन इन्क्वायरी केली. तुम्ही वीस हजार देत होतात. मी नाही घेतले, आता तीस हजार देताय ना?

वेलजी : आता नाय नाही म्हणायचा. चालून आलेल्या लक्ष्मीला ठुकरायचा नसते. नायतर मग लक्ष्मी पाठ फिरवते.

इन्स्पे. : यू आर राईट, आता मला कळलं की माझ्या घरी पैशांचे वांदे का असतात. तुम्हांला माहितेयं पगार पण वेळेवर मिळत नाही ओ. आज किती दिवसांनी तुमच्यामुळे हया लक्ष्मीचं दर्शन झालं. (पैसे हातात घेतो. ) नाही तर आमची लक्ष्मी म्हणजे माझी बायको पण मी घरात पाऊल ठेवल्या ठेवल्या तोंड वाकडं करून पाठ फिरवून निघून जाते. मी आधीच पैसे घेतले असते तर एवढया वर्षांत...... (बोटाने मोजू लागतो. ) किती कमावले असते.

वेलजी : जाऊ दे ना. देर आये पन दुरूस्त आये. आता लक्ष्मीला ठुकरायचा नाय. ठेवा ते पैसे.

इन्स्पे. : तरी शाळेत असताना कुठल्यातरी धडयात वाचलं होतं चालून आलेल्या लक्ष्मीला कोण करंटा लाथ मारेल. ok......, आजपासून कुणी प्रेमाने काही दिलं तर नाही म्हणणार नाही. तर सातारकर महाराज......आपलं...... (मनोरमाला. ) काय नाव हो हयांचं, हां... वेलजी. वेलजीभाई, आपण आम्हांला जीवनरसाचं जे अगाध ज्ञान दिलंत त्यासाठी आम्ही आपले आभारी आहोत. खिसापण एकदम भारी झालाय. ok......thank You......तुमचं चालू दे, ते मघाचचं. या इथं चाललं होतं ते. ते असं काही तरी. (त्यांची पहीली पोझ दाखवित. ) ok......काही कडक बोललो असेन तर मनात नाही ठेवायचं. काय...... आम्हां पोलीसांना युनिफॉर्मची इस्त्री आणि बोलणं दोन्ही कडकच ठेवावं लागतं नाही तर मग फाटयावर मारतील सगळे. (दोघे त्याच्याकडे पाहत

असतात. ) फाटयावर म्हणजे......, जाऊ दे तुम्हांला नाही कळणार ते. तुमचं चालू दे हा. पण दरवाजा आठवणीने नीट लावून घ्या. नाहीतर मग प्रश्न विचाराल. आत कसे आलात......बाय. (इन्स्पे. हसून निघून जातो. दोघे दरवाजा लावून रिलॅक्स होऊन बसतात. )

वेलजी ः थोडं पाणी मिळेल मनोरमाबाई

मनोरमा ः मनोरमाबाई......? एका क्षणात परकं केलंत.

वेलजी ः (तो तिच्या जवळ बसतो. ) मनोरमा......माला तसा नव्हता बोलायचा

मनोरमा ः (हलकेच हसत उठते. ) थांबा पाणी आणते. (ती उठून पाणी आणते व वेलजीला देते. वेलजी पाणी पिऊन ग्लास ठेवतो. )

वेलजी ः वस ना तू पण.

मनोरमा ः माझ्यामुळे तुमचं तीस हजाराचं नुकसान झालं.

वेलजी ः ये वेडाबाई, तू काय तीस हजाराचा एवढा टेन्शन घेते. आपली औकाद खूप मोठी असते. चल...... मी समझेल बिझनेसमध्ये जुआं खेलला. जाऊ दे आणि हे घे तुझे दहा हजार. (पाकिटातून दहा हजार काढून देतो. )

मनोरमा ः नाही नको. ठेवा ते. आधीच माझ्यामुळे तुमचं इतकं नुकसान झालंय.

वेलजी ः मनू, तू काय चिंधीचोर समझते काय मला. मी डायमंड किंग असते. लाखो-करोडोचा व्यवहार करते. हे तीस , चालीस हजार आपल्यासाठी बडी रक्कम नसते. फक्त आपण ते आपल्या इज्जतीला खूप जपते. पैसा काय हाताचा मैल आहे. पटापट कमावता येते. पन इज्जत मिटटीत जाते ना, तेवां मग तेचा खूप साइडइफेक्ट होते. घर, धंदा सगल्याचे बारा वाजते. अरे पाच वाजले. प्लीज माला एक कडक कॉफी मिलणार काय. कॉफी घेते आणि बॅक टू पॅवेलियन. अहमदाबादला जाते. हे दहा हजार ठेव. नाही म्हणायचा नाय. ठेव. (ती त्याच्या खांदयावर डोकं ठेवते. तो प्रेमाने तिला जवळ घेत

असतो आणि दरवाजावर ठकठक होते .) आता हया वक्ताला कोण आला . तो साला इन्स्पेक्टर परत नाय आला ना . हया लोकांना कितीपन दया कमीच साला . ते पैसे आधी उचलून आत ने . हया लोकानला गुजराती माणस म्हणजे एकदम पपलू वाटते काय . तू टेन्शन नाय घेयाचा . जास्त काय झाला ना तर मग बघ तू कशी तेची वर्दी उतरवते ते . तू पैसे ठेव मी उघडते दरवाजा . (ती पैसे भिंतीवर लटकवलेल्या कपडयाच्या पिशवीत ठेवते . तो जाऊन दरवाजा उघडतो .)

राजू ः (घरात येत . ) नमस्कार वेलजीभाई, नमस्ते मनोरमाबाई .

वेलजी ः सकाळी पाच वाजायचा आत तू हजर ?

राजू ः अहो . तुम्हीच तर म्हणाला होतात ना की पाच वाजता कॉन्टॅक्ट कर . तुम्हांला सकाळीच अहमदाबादला निघायचयं .

वेलजी ः कॉन्टॅक्ट कर म्हंजी फोनवर कॉन्टॅक्ट कर गधेडा......

राजू ः वेलजीभाई तुमचा मोबाईल स्वीच ऑफ आहे . आणि हे बघा हा रिसीव्हर तुम्ही लोकांनीच उचलून बाजूला ठेवलाय .

वेलजी ः रिसीव्हर बाजूला ठेवलाय म्हंजे काय? साला दर आध्या कल्लाकमंदी तू फोन करते काही प्रॉब्लेम आहे काय तुझा? आरे तुझ्या फोनपायी किती प्रॉब्लेम होत होता माझा माहितेय काय, आनी बाकी कसर तो पुलिसवाला काढून गेला .

राजू ः पुलिसवाला......?

मनोरमा ः हो......इन्स्पे . आले होते . राजधन शृंगरपुरे . गांवदेवी पोलीस ठाण्यातून .

राजू ः शीट......मग......मग काय झालं ?

मनोरमा ः काही नाही .

वेलजी ः काहीच नाही . मी सगळा सेटल करून टाकला . आता काय बी प्रॅाब्लेम नाय होनार .

राजू ः तुम्ही ओळखता त्या राजधन शृंगारपुरेला

वेलजी ः हो .

राजू ः काय...?

वेलजी ः आरे म्हंजी आता थोडया टायमाआधीच जान पहचान झाला ना आमचा .

राजू ः तुम्ही काय सेटलमेंट केलीत?

वेलजी ः रोकडा टाकला तीस हजार . टाकला म्हंजी दिला त्याला तीस हजार रोकडा

राजू ः तो तीस हजार घेऊन गेला . म्हणजे खाया ना पिया, ग्लास फोडा बारा आना .

वेलजी ः हा, पन ते सगळा माझ्यापाशी तुझ्याशी ठरले प्रमाने दस हजार मी मनोरमाबाई कडे दिलाय .

मनोरमा ः मी काय म्हणते वेलजीभाई

वेलजी ः भाई नाय बोलायचा . आनी आता कुनीपन कायपन नाय बोलायचा . राजू थैक्स . आजची रात माझ्या लाइफलौंग लक्षामंदी राहनार . पुढल्या टाइमाला मी परत येल तेवा आपन इथं नाय दुसरीकडं भेटायचा .

राजू ः पुढच्या वेळेचं पुढच्या वेळी पाहू हो पण त्या इन्स्पेक्टरचं काय ?

वेलजी ः आता त्याचा आनखीन काय बाकी हाय काय ?

राजू ः तुम्हांला वाटतय तो गप्प बसेल .

वेलजी ः अरे येडा हाय काय तू . तू ठिकाना बदलून टाक ना . त्याच्याकडे इथला पता

आहे. दूसरा पता त्याला कसा मिलनार. ये......त्याच्याकडे माझा पता पन आहे. अहमदाबादचा. मी स्टार्टींग स्टार्टींगला थोडा घाबरला होता ना तेवा मी त्याला माझा पता सांगितला होता. राजू तो माला पकडायला अहमदाबादला नाय पोचेल ना? मग माझी बायडी माला कायमचीच पोचवून टाकनार. पन मी तर त्याला तीस हजार दिलाय यार..

राजू ः वेलजीभाई, पैशासाठी तो चंद्रावर पण पोहोचेल. तुम्हांला मुंबई पोलिसांचे रेकॉर्ड माहीत नाहीत अजून. कोणाला पण कुठून पण शोधून काढतात ते. (वेलजी कपाळावरचा घाम पुसतो.)

वेलजी ः राजू, तू मला सांगतेयस की घाबरवतेयस ?

राजू ः आता काय समजायचय ते समजा. पण आता जर त्याच्याशी पूर्ण सेटलमेंट नाही केली ना, तर तो अहमदाबादला पोहोचलाच म्हणून समजा.

वेलजी ः मग आता काय करायचा. चल आपन दोघे पुलिस स्टेशनमंदी जाऊन त्याला भेटू.

राजू ः स्वतःच्या हातानी स्वतःचाच गळा कापायचाय. माझं काही नाही. मला काय मला सवय आहे पोलीस स्टेशनाची. पण तुम्हांला लॉकअपमध्ये टाकलं तर.

वेलजी ः असा कसा लॉकअपमंदी टाकेल. मी त्याला आजून दहा-वीस हजार रूपये देल.

राजू ः दहा...... वीस......?

वेलजी ः नाय माननार...? मग पचास हजार देल.

राजू ः पन्नास हजार ?

वेलजी ः राजू, साला माला घाबरवते काय तू. हे बघ माझ्याकडे फक्त एक लाखाची

कैश उरलेय. चल तू, आपन समदा मामला रफा-दफा करायला सांगू.

राजू : मी काय म्हणतो. मी बघतो पोलीस स्टेशनचं. तुम्ही नका येऊ पोलीस स्टेशनात. उगाच तिथे काय परत दुसरं लफडं झालं तरं?

वेलजी : अरे पन मी नाय येल, तर मग तो पहुंचनार ना अहमदाबादला.

राजू : नाही पोचणार. मी माझ्या एका मित्राला घेऊन जातो. सेटेलमेंट करायला त्याची पोलीस स्टेशनात चालते.

वेलजी : मी वरती फोन लावू काय?

राजू : आता वरती, खालती कुठे फोन लावू नका. ती गुजरातची पुलीस नाही. मुंबई पोलीस आहे. डायरेक्ट बांबूच टाकते.

वेलजी : बांबू. . , आरे तो इन्स्पेक्टरपन सारखा बांबू, बांबूच करत होता. तू एक काम कर, तूच सेटलमेंट कर मी पळते.

राजू : वेलजीभाई, ते......

वेलजी : ते......काय.

राजू : ते एक लाख दयावे लागतील ना त्याला.

वेलजी : आं......हा, हे घे. (त्याला पैसे काढून देतो. ) एकदम बराबर सेटलमेंट कर हां. साला कितीला पडला सौदा...... (मनोरमा वेलजीकडे पाहते. ) नाय काय नाय. काय बी प्रॉब्लेम नाय. मी येते. माला अहदाबादला पोचायला पायजे ना. राजू तू बघ ते सेटलमेंटचा.

राजू : तुम्ही काही काळजी करू नका. तुम्ही निवांत जा अहमदाबादला. मी बघतो काय करायचं ते. (वेलजी दरवाजातून परत मनोरमाजवळ येतो. )

वेलजी ः सॉरी. मी बघेल, जमेल तर परत येल. तू काय बी मनावर घेयाचा नाय. पैसा काय आनी जानी असते. सिर सलामत तो पगडी पचास. चल बाय, येते मी.

मनोरमा ः सांभाळून जा. मी वाट पाहीन तुमची. (मनोरमा त्याला सोडते. दरवाजातून बाय करते व दरवाजा आड करून राजूकडे पाहून हसते. ) एस......एक लाख दहा हजार.

राजू ः सो......डार्लिंग...... आता आजच्या आज इथून आपलं बस्तान हलवायचं आणि नवा बकरा शोधायचा.

मनोरमा ः शुअर डार्लिंग. (ती येऊन त्याच्या गळयात हात टाकते. तो सोफ्यावर बसलेला आहे. ) आता पुढे काय? ए, मला कंटाळा आलाय हा. दोन चार दिवस कुठेतरी मस्त ऐश करून येऊ. हातात माल पण झक्कास आलाय. एं......गोवा......गोव्याला जाऊया नां.

राजू ः ओके, जान. गोव्याला जाऊया, पण पुढच्या आठवडयात.

मनोरमा ः पुढच्या आठवडयात का ? आपल्याकडे इतके पैसे आहेत मग, प्रॉब्लेम काय आहे?

राजू ः हे बघं, तो इन्स्पे. इथे येऊन गेलाय. आपल्याला आजच्या आज रूम बदलायला पाहीजे आणि दुसरा एक बकरा सेट केलाय. त्याला परवा आपल्या नविन घरात बोलवून हलाल करूया आणि मग दोन-चार दिवसांसाठी नाही. .. मस्त दोन चार आठवडयासाठी जाऊया गोव्याला. ते पण विमानानं.

मनोरमा ः ओह माय गॉड. ग्रेट यार. . दोन आठवडे मस्त धमाल करूया. गोव्याच्या सगळया बीचवर फिरायला जायचं. गोवा, बीच, बियर आणि फिश......वॉव...... काय मस्त धमाल येईल ना?

राजू ः तू बरोबर असल्यावर नेहमीच धमाल येते. ए...... नववारीमध्ये एकदम हॉट

दिसतेस हां. (तिचा हात धरून तिला जवळ ओढतो. )

मनोरमा ः हॉट कॉफी पिणार ?

राजू ः कोल्ड कॉफी दिलीस तरी चालेल. तुझ्या हाताने पिताना ती ऑटोमेटीक हॉट होईल.

मनोरमा ः (हसते व कॉफी बनवायला जाते. ) बोल लवकर. . दोन कप ठेवू ना?

इन्स्पे. ः (दरवाजा उघडून आत येतो. ) चार कप. दोन तुमच्यासाठी आणि दोन आमच्यासाठी. काय वेलजीभाई, कॉफी पिणार ना? हॉट कॉफी, तशी कोल्ड कॉफी ही मनोरमाबाईच्या हाताने एकदम हॉट होते.

राजू ः इन्स्पेक्टर साहेब......

इन्स्पे. ः कानफाट फोडेन. त्या कोप-यात जाऊन उभा रहा. पळायचा वगैरे प्रयत्न करू नकोस नेमबाजीमध्ये गोल्डमेडलिस्ट आहे मी. अशा जागेवर गोळी मारेन ना की मग धुवायचे देखील वांदे होतील. बिल्डींगबाहेर माझ्या टीमने फुल फिल्डींग लावलेय. खिडकीतून उडी मारलीस तरी कॅचआऊट होशील. काय मनोरमाबाई ? (ती पदर डोक्यावर घेते. ) पिक्चर संपला हो. आता किती कराल ॲक्टींग. मक्याशी ओळख करून देऊ का तुमची? त्याच्या नव्या पिक्चरमध्ये एक हिरोइन पाहिजेय. एकदम हॉट...... तुमच्यासारखीच. करणार पिक्चरमध्ये काम?

मनोरमा ः मी ते......इन्स्पेक्टर साहेब...... तुम्ही.........

इन्स्पे. ः काय...... मी कायं, तुम्ही काय...... पुन्हा सांगताय मला. सकाळी साडेपाच वाजता एकटया बाईच्या घरी येणं हा कायदयानं गुन्हा आहे. कायदा कोळून प्यायलोय हो मी. कॉफी पाजताय ना. चार कप आपल्या चौघांना. कॉफी पित पित बोलू. सकाळ पण झालेय. काय......नाइट डयूटी खूप कठीण असते हो. रात्रभर शरीर कसंतरी साथ देतं. पण सकाळ झाल्या झाल्या गळून

जायला होतं. किती दिवस विचार करतोय. बायकोला घेऊन गोव्याला जायचयं. स्वतःच्या.. स्वतःच्या लग्नाच्या बायकोला. पण काय, परवडत नाही हो आपल्याला. पोलिसांना पगारच काय असतो हो. नाही, खर्च नाही परवडत गोव्याचा. आमच्या नावाने बघा ना काहीजण दुस-यांकडून लाखभर रूपये घेतात आणि गोव्याला विमानानं जायला निघतात. आयजीच्या जिवावर बायजीची मजा. पटेल साहेब जास्त विचार करू नका. ही म्हण तुम्हांला नाही कळणार आणि एक्सप्लेन करायला मला वेळ नाही. कॉफी होतेय ना. काय थोडा थकवा जाणवतोय. तर लाखभर रूपये खूप मोठी अमाऊंट असते हो. (राजू लगेच एक लाख रूपये इन्स्पेक्टरच्या हातावर ठेवतो.) एक लाख रूपये आहेत का? किती वजन असतं हो एक लाखाचं. आज हातात नोटाच नोटा येतायत. काय लकी दिवस आहे हो. दिवस नाही रात्र बोलायला पाहिजे. अरे रात्र तर संपली सकाळ झाली आता. ते काय, कावळे पण काव-काव करायला लागले. माझ्याकडे काय बघताय. खिडकीतून बाहेर बघा. त्या झाडावरच्या कावळयांबदद्ल बोलतोय मी. असो......कॉफी झाली का? बोलून बोलून घसा दुखायला लागला. थोडा शेक दयावा म्हणतो, हॉट कॉफीनं. हा घेऊन या हॉट कॉफी. (ती कॉफी देते.) थँक्यू... एकदम हॉट कॉफी आहे. जीभ भाजली आपली. पदर काढलात डोक्यावरून तरी चालेल. पोलीस स्टेशनात गेल्यावर आपण ॲक्टींग-ॲक्टींग खेळू. बरं हेच का ते लाखभर रूपये जे आपण आमचं नाव वापरून कमावलेत.

राजू ः ठेवा ना साहेब, ते म्हणजे.. तुमचेच पैसे आहेत ना.

इन्स्पे. ः अहो मी दगडी चाळीत राहणारा सामान्य माणूस. (राजू उठून उभा राहतो.) खाली बसा. त्या दगडी चाळीत नाही. म्हणजे मी चाळीत राहणारा साधा माणूस. लाखभर रूपये माझ्या लग्नातपण गोळा झाले नव्हते. बायकोच्या बापाने हुंडापण दिला नव्हता लग्नात. पी. आय. होता तिचा बाप. म्हणजे मोठा ऑफिसर. बोलला पोरगी लक्ष्मी आहे. तिला पदरात टाकलय तुझ्या. तिचा नीट सांभाळ कर. तेव्हा कायपण कळलं नाही. नंतर कळलं पोरगीचं

म्हणजे माझ्या बायकोचं नाव लक्ष्मी आहे. तिला सुखात ठेवायचयं. पदराची काय भानगड ती अजून काय ध्यानात नाही आलंय. मी कधी साडी नेसली नाय ना. मग पदरात कसं काय ते ठेवणार. असो...... कॉफी मस्त होती. एकदम हॉट......(ती पदर डोक्यावर ठेवत असते. ) पदर खाली. वेलजीभाई हेच काय ते तुमचे एक लाख रूपये?

वेलजी : हो.

इन्स्पे. : घ्या, मोजून घ्या. बरोबर आहेत ना.

वेलजी : आता काय मोजायचे.

इन्स्पे. : नाही मोजायचे मग ठेवा पाकिटात. तुमच्या पाकिटात हां... माझ्या नाही काही ... आता तुम्हांला काही बोलायचयं तुमच्या हया नातेवाईक मनोरमा सहस्त्र... मनोरमाबाईंना. .

वेलजी : आता काय बोलणार मी ?

इन्स्पे. : बोला, जे काय जमेल ते बोला.

वेलजी : तू असा नाय करायला पायजे होता मनू.

इन्स्पे. : मनूतून बाहेर या.

मनोरमा : आय एम सॉरी. इन्स्पेक्टर साहेब...... आम्ही मुददामुन...... म्हणजे आम्ही......

इन्स्पे. : नवीन स्टोरी नाही आठवत. मी अहमदाबदचा नाही हां. मी महाराष्ट्राचा आहे आणि शून्यातून बरच काही नवनिर्माण करू शकतो. नावात पण राज आहे माझ्या. विनोद नाही करत आहे मी. हया गुजरातमधून आलेल्या व्यापाऱ्याला चुना लावलात तुम्ही. माझ्या नावाने पण पैसे खाल्लेत. म्हणजे हा गुजराती गुजरातमध्ये जाऊन सांगणार, मुंबईचे मराठी चुना लावण्यात किती

एक्सपर्ट आहेत. मुंबईचे पोलीस किती लाचखोर आहेत. हयांना चुना लावून तुम्ही गोव्याला जाऊन ऐश करणार आणि तुमच्या ऐशसाठी मुंबई आणि मुंबई पोलीसांचं नाव मातीत टाकणार तुम्ही. हया मातीत भ्रष्टाचाराची किड खूप पसरलेय पण अजूनही हया शृंगारपुरेसारखे इमानदार पोलीस अधिकारी आहेत या मुंबईमध्ये. आणि फक्त पैसेच खायचे असतील तर मग पोलीसच कशाला व्हायला पाहीजे. पालिकेतला शिपाईपण आमच्यापेक्षा जास्त कमाई करतो. सॅटरडे, संडे ऑफ घेऊन सुध्दा. गेला महिनाभर तुमच्या दोघांच्या मागावर होतो मी. तुमची बंटी-बबलीची केस मीच मागून घेतली होती. कठीण केस सॉल्व्ह करायची खाज आहे आपल्याला. खाज सुटल्यावर खाजवायला जी मजा वाटते ना ती खाजवणा-याला माहीत. मी मघाशी आलो होतो ना तेव्हा इथं टेलिफोनच्या बाजूला हा मायकोफोन ठेवून गेलो होतो. मी मुददामच टेलिफोनच्या बाजूला ठेवलेल्या रिसीव्हर बददल तुम्हांला काहीच प्रश्न विचारला नाही. तुम्हांला मी पेडगावचा येडा-खुळा वाटलो असेल नाही. आणि हा घंटोळया या इथं येऊन घुटमळून पण गेला. (राजूला उददेशून.) पण गाढवीच्याला मायक्रोफोन कळलाच नाही. मायक्रोफोन इथं ठेवून मी मस्त इथली रनिंग कॉमेंट्री खाली गाडीत बसून ऐकत होतो. हे वेलजीभाई खाली आले. त्यांनापण थोडं ऐकवलं. एक्स्प्लनेशन दयायला काही नसेलच तुमच्याकडे. anyway, आता हया घरातून डायरेक्ट सरकारी घरातच शिफ्टींग करा. भाडही वाचेल तुमचं. बाकी गोवा, बीच, बिअर आणि फिशचा बंदोबस्त आपण सरकारला करायला सांगू. काय...... अरे हि अगरबत्ती आणि कापराची वडी इथेच पडली आहे का अजून? असे काय पाहताय. (खिशातून दात काढून लावतो. ) मी घंटानाद घंटे. एक मेहनती आणि प्रामाणिक माणूस आहे मी. जेम्स बोंड ००७... अजून काही बोलावसं वाटतंय का आता? काय.. पटेलसाहेब, तुम्हांला तुमचे सगळे पैसे मिळाले ना?

वेलजी : हो साहेब. हे एक लाख रूपये आणि हे तीस हजार जे तुम्ही मघाशी गाडीत परत केलेत. thank you so much sir, तुम्ही खरच चांगले ऑफिसर असते.

इन्स्पे. : असते नाही आहात. व्याकरणाने खूप घोळ होतो हो. (दोघेही हसतात.)

वेलजी : पैशाचं काही नाही साहेब, पैसा खूप बघितला आपण. पन कोन मन दुखावते ना, तेवा लय वाईट वाटतं साहेब. फक्त या कागदाच्या चार तुकडयासाठी आपण कोनाच्या तरी मनाशी खेळते. माणस साला पैसाचा गुलाम बनून गेलाय. माणसानं पैसा स्वतःसाठी बनवला आनी आता माणस फक्त पैसासाठीच बनून राहीलाय. म्हनून तर पैशासाठी भाव भावाला मारते, पोरगा बापाला मारते. आपन जिच्यावर प्रेमाच्या दोन बोलासाठी विश्वास टाकते ना ते पन पैशासाठी आपला गळा कापते. (मनोरमा जाऊन टांगलेल्या पिशवीतून दहा हजाराच बंडल काढून वेलजीपुढे ठेवते.)

मनोरमा : आय एम सॉरी वेलजीभाई. शक्य झाल्यास आम्हांला क्षमा करा. इन्स्पेक्टर साहेब, आमचे सर्व गुन्हे आम्हांला कबूल आहेत. कायदा देईल ती शिक्षा भोगायला आम्ही तयार आहोत.

राजू : होय साहेब, फक्त मौजमजेसाठीच आम्ही हे सारं करीत आलो. आम्ही दोघेही वेलएज्युकेटेड आहोत. पण पैसा कमवायचा शॉटकट सापडला होता आम्हांला. पैसा कमावताना कोणाच्या मनाचा विचार नाही केला आम्ही. आणि पोलीस काय करणार. पैसे घेऊन गप्प बसतील म्हणून बिनधास्त होतो. एकच रिक्वेस्ट आहे साहेब. आम्हांला लॉकअपमध्ये टाका पण मिडीयापासून दूर ठेवा साहेब. नाहीतर आमच्यामुळे आमचे आई वडील, भाऊ बहीण लोकांच्या रागाला बळी पडतील.

मनोरमा : वेलजीभाई, (हात जोडत) आमच्या मुंबईबदद्ल प्लीज कोणाला वाईट सांगू

नका. कदाचित आज आमचं मन जागं झालं. तसं एक दिवस सगळयांच मन जागं होईल आणि मुंबई पहिल्यासारखीच स्वच्छ आणि निर्मळ होईल. चला साहेब.

इन्स्पे. ः वेलजीभाई, तुम्हांलाही थोडा वेळासाठी पोलीस स्टेशनात यावं लागेल. and I Promise मी कधीही तुमच्या अहमदावादच्या दामजी लेनमधल्या, पटेल हाउसमध्ये येणार नाही. (हसतो......)



!! श्री स्वामी समर्थ !!

सदर पुस्तकातील नाट्यप्रयोगासाठी कृपया आपण **9987311359** किंवा **9324466129** या भ्रमणध्वनी क्रमांकावर अथवा sandeepsurve25@gmail. com या ईमेलवर संपर्क साधावा.

योग्य परवानगीशिवाय प्रयोग केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**धन्यवाद !**



**संदीप शांताराम सुर्वे.**

**मुंबई**

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान